अलिबाग येथील खडतालपूल जवळ अलिबाग-रेवस रोडला लागून सुमारे अडीच गुंठे सेप्रेट सातबारा असलेली जागा विकणे आहे.
संपर्क- ७७६८८६८०००

वृषीवल

रायगड ॥ रविवार, दिनांक ६ फेब्रुवारी २०२२

किंमत ४ ₹

शिक्षकांचा लाक्षणिक संप

जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

राज्य सरकारी, निमसरकारी, जिल्हा परिषद कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीतर्फे महाराष्ट्र व्यापी दोन दिवसाचा लाक्षणिक संप दिनांक २३ व २४ फेब्रुवारी २०२२ रोजी घोषीत करण्यात आला आहे. या संपाची सूचना रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना देण्याचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे यांना राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे जिल्हा अध्यक्ष संदीप नागे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने निवेदन सादर केले.

सर्वांना जुनी पेन्शन मंजूर करण्याबाबत केंद्र •> पान २ वर

लतादीदींची प्रकृती अत्यवस्थ

उपचारांना प्रतिसाद; डॉक्टरांची माहिती

। मुंबई । वृत्तसंस्था ।

गानसम्राज्ञी आणि भारतरत्न लता मंगेशकर यांची प्रकृती अचानक बिघडली आहे. त्यांना श्वास घेण्यास त्रास होऊ लागल्याने व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले आहे. लतादीदींची प्रकृती चिंताजनक असल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरल्याने त्यांच्या चाहत्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. लता मंगेशकर यांच्यावर मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

त्यांच्यावर उपचार सुरू असून त्या उपचारांना चांगला प्रतिसाद देत आहेत, अशी माहिती लतादीदींवर उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी दिली आहे.

मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे, खा. सुप्रिया सुळे, रश्मी ठाकरे यांनीही डॉक्टरांकडून लतादीदींच्या प्रकृतीची विचारपूस केली. तसेच मंगशेकर कुटुंबीयांशीही संवाद साधून राज यानी लतादीदींच्या प्रकृतीची विचारपूस केली. •> पान २ वर

व्हेंटिलेटर काढले होते

गेल्या २७ दिवसांपासून लता मंगेशकर यांच्यावर ब्रीच कँडीत उपचार सुरू आहे. त्यांनी उपचारांना प्रतिसादही द्यायला सुरुवात केली होती. त्यामुळे त्यांचे व्हेंटिलेटर काढण्यात आले होते. त्यामुळे त्या लवकरच घरी परततील असे सांगितले जात होते. मात्र, शनिवारी अचानक त्यांची तब्येत बिघडल्याने चिंता वाढली आहे.

म ह त्त्वा चे

हिंदुस्तानी भाऊच्या कोठडीत वाढ

। मुंबई । वृत्तसंस्था ।

हिंदुस्तानी भाऊ अर्थात विकास पाठक याला वांद्रे न्यायालयात शनिवारी हजर करण्यात आले. शनिवारी पोलीस कोठडी संपत असल्याने न्यायालयात हजर केले असता चौदा दिवसांची न्यायालयीन कोठडी न्यायालयाने सुनावली आहे. विद्यार्थी आंदोलन प्रकरणी हिंदुस्तानी भाऊला धारावी पोलिसांनी अटक केली होती.

किरीट सोमय्यांना धक्काबुक्की

। पुणे । वृत्तसंस्था ।

महापालिकेच्या जम्बो कोव्हिड रुग्णालयाच्या कामात भ्रष्टाचारासंदर्भात महापालिका आयुक्तांना निवेदन देण्यासाठी पुणे महापालिकेत आलेल्या भाजप नेते किरीट सोमय्या यांच्यावर शिवसैनिकांनी जोरदार हल्ला केला. या घडलेल्या प्रसंगामुळे प्रचंड खळबळ उडाली.

नितेश राणेंची सोमवारी सुनावणी

सरकारी वकिलांनी मागितली वेळ

। मुंबई । वृत्तसंस्था ।

आमदार नितेश राणे यांच्या जामीन अर्जावर शनिवारी सुनावणी होणार होती. परंतु विशेष सरकारी वकील प्रदीप घरत यांनी वेळ मागितला आहे. त्यामुळे ही सुनावणी सोमवारी (७ रोजी) होणार आहे.

नितेश राणे यांना शुक्रवारी न्यायालयीन कोठडी झाल्यानंतर त्यांचे वकील संग्राम देसाई यांनी तात्काळ जिल्हा न्यायालयात जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. तो अर्ज दाखल करून घेत वकील •> पान २ वर

दिल्ली, जम्मू-काश्मीरमध्ये भूकंप

। जम्मू-काश्मीर । वृत्तसंस्था ।

जम्मू-काश्मीर आणि पंजाबच्या काही भागात भूकंपाचे तीव्र झटके जाणवले आहेत. शनिवारी सकाळी भूकंपाचे झटके जाणवले. जम्मू-काश्मीर पाठोपाठ दिल्ली-नोएडा आणि चंडीगढ या शहरात देखील भूकंपाचे झटके जाणवल्याने भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दुप्पट पैशाच्या आमिषाने खोपोलीत गंडा

पावणे दोन लाखांना गंडविले

। खोपोली । प्रतिनिधी ।

रक्कम दामदुप्पट करून देण्याचे आमिष दाखवून खोपोलीतील तरूणाला गंडा घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. खोपोली पोलिसात याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, दुप्पट पैशाची लालूच खोपोलीतील विनय कुमार गोविंद तालिकोटी (वय ५३) रुम नं.ए १०५, लौजी रेसीडेन्सी, उदयविहार यांना चांगलीच महागात पडली असून ऑनलाइन गुंतवणुकीत सुमारे पावणे दोन लाखाचा गंडा भामट्याने घातला आहे. विनय कुमार यांनी •> पान २ वर

एसटी बंद असल्याने प्रवाशांचे हाल

। नेहा कवळे ।

। अलिबाग ।

रायगडात एसटी कर्मचाऱ्यांचा संप सुरूच असल्याने प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. संप कधी संपेल, याबाबत अनिश्चितता आहे. संपामुळे प्रवाशांची गैरसोय होत असून एसटी महामंडळालाही मोठा आर्थिक फटका बसत आहे. शिवाय इको, मिनीडोअर आणि रिक्षा चालकांकडून अव्वाच्या सव्वा भाडे वसुली करून सर्वसामान्य प्रवाशांना वेठीस धरले जात आहे. अलिबाग आगारातील बस ८ नोव्हेंबरपासून बंद आहेत. त्यामुळे एसटीच्या मार्गावर इको, •> पान २ वर

> बाजारपेठेतील सर्वच वस्तूंच्या किमती वाढल्यामुळे भाडे वाढविल्याचे काही इको चालक, मिनिडोअर चालक, रिक्षाचालकांनी सांगितले. स्वतःचे वाहन नसल्यामुळे एसटी प्रवासासाठी महत्त्वाची आहे. एसटीचे भाडेही परवडणारे आहे. परंतु कित्येक दिवसापासून एसटी बंद असल्यामुळे मोठी गैरसोय होत आहे.
>
> – अभय मढवी, प्रवासी, आक्षी ग्रामस्थ

अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

६ फेब्रुवारी

१) श्रीम. नलिनी नारायण पटवर्धन
ब्राम्हण आळी अलिबाग,
६ फेब्रुवारी १९२८

२) श्रीम.ज्योत्स्ना विनोद नाईक
ब्राम्हण आळी, अलिबाग
६ फेब्रुवारी १९५२

३) श्री.विश्वनाथ शिमगा भगत
अलिबाग कोळीवाडा
६ फेब्रुवारी १९५३

४) रमेश काशिनाथ पडते
पडते-वाडी रामनाथ, अलिबाग
६ फेब्रुवारी १९५८

मुंबई विद्यापीठ युवा महोत्सवात

पीएनपीचा विराज ठरला रौप्यपदकाचा मानकरी

चित्रलेखा पाटील यांनी केले विशेष कौतुक

। अलिबाग । प्रतिनिधी ।

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटी आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज, वेश्वी-अलिबाग महाविद्यालयाचा विराज गणेश म्हात्रे हा मुंबई विद्यापीठांतर्गत आयोजित ५४ व्या युवा महोत्सवात रौप्यपदकाचा मानकरी ठरला आहे. त्याने युवा महोत्सवातील भारतीय पारंपरिक तालवाद्य स्पर्धेत सहभाग नोंदविला होता.

या नेत्रदीपक यशाबद्दल संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, विशेष कार्यकारी अधिकारी संजय मिर्जी, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. ओमकार पोटे यांनी अभिनंदन केले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२१ -२०२२ या वर्षातील मुंबई विद्यापीठ अंतर्गत ५४ व्या युवा महोत्सवात ३ जानेवारी ते १५ जानेवारी यादरम्यान विभागीय स्तरातील निवड चाचणी घेण्यात आली होती. यामध्ये रायगड दक्षिण विभागामधून विराजने प्रथम क्रमांक पटकावत आपले स्थान अंतिम फेरीमध्ये निश्चित केले.

या महोत्सवातील अंतिम स्पर्धेला १ फेब्रुवारीपासून सुरुवात झाली असून, ३ फेब्रुवारी २०२२ रोजी भारतीय पारंपरिक वाद्यप्रकार - तालवाद्य या प्रकारामध्ये दुसरा क्रमांकाचे यश संपादित करत विराज रौप्य पदकाचा मानकरी ठरला आहे.

या स्पर्धेचे महाविद्यालयीन नियोजन विद्यार्थी विकास विभाग प्रमुख तथा सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. नम्रता चोगले व प्रा. निकीता पाटील यांनी पाहिले.

यापूर्वी विराज म्हात्रे यांनी सह्याद्री वाहिनीवरील भजनमाला या कार्यक्रमात भजनमाला या कार्यक्रमात सादरीकरण केले आहे. तर दूरदर्शन रेडिओ कार्यक्रमात साथसंगत केली आहे. अनेक भजन स्पर्धेत उत्कृष्ट पखवाज वादक म्हणून परितोषिक पटकाविले आहे.

म ह त्त्वा चे

दारु विक्रीप्रकरणी कारवाई

। कोलाड । वार्ताहर ।

कोलाड हद्दीत आंबिवली आदिवासीवाडी येथे राजरोसपणे अवैध गावठी दारू विक्री होत असल्याची माहिती कोलाड पोलिसांना लागताच कोलाड सपोनि सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी सापळा रचून या दारू विक्रीवर कारवाई केली आहे. संबधित माल हस्तगत करण्यात आला असून, अधिक तपास पोलीस करीत आहेत.

रसायनीत महिला जनजागृती शिबीर

। रसायनी । वार्ताहर ।

जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली रसायनी पोलीस ठाणेअंतर्गत वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास दादाभाऊ डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली महीला जनजागृती शिबिराचे आयोजन रसायनी पाताळगंगा अतिरिक्त एमआयडीसी हद्दीतील कोकीयो कॅमलीन कंपनीमध्ये करण्यात आले होते. चावणे येथील कोकिओ कॅमलीन कंपनीमध्ये महिला सुरक्षा जनजागृती अनुषंगाने महिला पोलीस हवालदार मानसी पाटील, महीला पोलीस नाईक म्हात्रे यांनी शिबिरात उपस्थित महिला कर्मचाऱ्यांना महिला अत्याचार व महिला सुरक्षा यावर मार्गदर्शन केले. या मार्गदर्शन शिबिरात शंभर महिला कर्मचारी उपस्थित होत्या.

आरोग्य कर्मचारी वेतनावाचून वंचित

✻ ५ महिने मिळाला नाही पगार ✻ कर्जत लसीकरण संघर्ष समितीची नाराजी

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत शहरातील उपजिल्हा रुग्णालयात कोव्हिड प्रतिबंधात्मक लसीकरणाची सेवा अखंडित सुरू ठेवणारे दोन आरोग्य कर्मचारी गेले पाच महिले वेतनावाचून वंचित आहेत. याबाबत कर्जत लसीकरण संघर्ष समितीने नाराजी व्यक्त केली आहे.

कोव्हिडवर मात करण्यासाठी प्रतिबंधात्मक लसीकरण हा एक प्रभावी उपाय असून, यासाठी सर्व प्रशासकीय यंत्रणा गेली दोन वर्ष अविरत मेहनत घेत आहेत. यानुसार मार्च २०२१ पासून कर्जत नगरपालिका प्रशासनाने आपल्या आरोग्य सेवेतील दोन महिला कर्मचारी यांना उपजिल्हा रुग्णालयात सेवेत नियुक्त करण्यात आले आहे.

प्रतिक्षा सिंग आणि शाहीन मुजावर या दोन तरुणी कर्जत नगरपरिषदेच्या वतीने उपजिल्हा रुग्णालयात प्रतिबंधात्मक लसीकरणाचे कर्तव्य प्रामाणिक हेतुने निभावत आहेत. मात्र, याचे कर्जत नगरपरिषद प्रशासनास

त्याचे काहीच सोयरसुतक नाही. नगरपरिषदेच्या हलगर्जीपणामुळे सदर तरुणींना सप्टेंबर २०२१ पासून कुठल्याही प्रकारचे वेतन दिले गेलेले नाही. याबाबत कर्जत लसीकरण संघर्ष समितीने नाराजी व्यक्त केली आहे.

> **कर्जत नगरपरिषदेच्या संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना जर सहा महिने वेतन मिळाले नसते, तर त्यांनी नक्कीच गदारोळ केला असता. पण या कंत्राटी कामगारांच्या पगाराबाबत कोणीही पुढकार घेत, त्यांना त्यांच्या हक्काचा पगार मिळावा यासाठी धावपळ करीत नाही. तरी कर्जत नगरपालिका प्रशासनाने याबाबत आवश्यक ती कारवाई करावी.**
>
> **- विनोद पांडे, कर्जत लसीकरण संघर्ष समिती**

पनवेलमध्ये हळदीकुंकू समारंभ

। पनवेल । प्रतिनिधी ।

तळोजा फेज २, ग्रीनहूड सोसासटी येथे नुकताच हळदीकुंकू समारंभ संपन्न झाला आहे. हळदीकुंकू समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून शारदा पाटील, राजाराम पाटील, के.टी. पाटील, मदन मते, ग्रीनहूड सोसायटीचे चेअरमन राकेश विचारे, विजय राठी आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी महाराष्ट्र शासनाच्या विविध योजना महिला बचत गटांना मिळवून देण्याची ग्वाही आणि सोसायटींच्या असलेल्या अडचणी सोडवण्यात येतील, असे प्रतिपादन पनवेल विधानसभा अध्यक्ष पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती

आणि विधमान सदस्य काशीनाथ पाटील यांनी केले आहे.

ते पुढे म्हणाले, येत्या काळात ग्रीनहूड सोसायटी आणि समृद्धी सोसायटी येथील सर्व नागरिकांना पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळावे यासाठी येथे आरोप्लान्ट बसवून देण्याची घोषणा केली. तसेच महिला गटासाठी शासनाकडून मिळणारे १५ हजार रुपये लवकरात लवकर मिळवून देऊ, असेही सांगितले.

या हळदीकुंकू समारंभासाठी महिला बचत गटाच्या अध्यक्षा कांचन विचारे, पुष्पा राठी, सोनल पाटील आणि महिला बचत गटाच्या ७० ते ८० महिला उपस्थित होत्या.

संतान पाटील यांना सेवानिवृत्ती

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

रायगड जिल्हा परिषद पंचायत समिति सुधागड पाली येथे कार्यरत असलेले बांधकाम कनिष्ठ अभियंता संतान सुदाम पाटील नुकताच सेवानिवृत्त झाले आहेत.

एका कार्यक्रमात त्यांना निरोप देण्यात आला असून, यावेळी पंचायत समिती सुधागडचे सभापती नंदू सुतार तसेच सुधागड पालीचे गटविकास अधिकारी विजय यादव व गटशिक्षण अधिकारी पवार आणि कर्मचारी वृंद भगिनी उपस्थित होते.

संतान पाटील हे शांत मनमिळावू स्वभावाचे तसेच कामात कार्यतत्पर असलेले

अभियंता असून, त्यांनी सुधागड पाली तालुक्याची सेवा केली. कार्यक्रमाच्या अंती संतान पाटील यांनी त्यांच्या ३७ वर्ष सेवेच्या कालावधीत कसे चढ-उतार आले आणि त्यांनी ते कसे सामोरे गेले याबद्दल मनोगत व्यक्त केले.

इन्स्टिट्यूट ऑफ टेकनॉलॉजिचे यश

। खेड । प्रतिनिधी ।

तालुक्यातील घरडा इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी लवेलने मुंबई विद्यापीठाच्या ५४ व्या आंतरमहाविद्यालयीन युवा महोत्सवामध्ये यश मिळविले आहे. यामध्ये अभियांत्रिकी विभागातील संगणक या प्रमुख विषयाच्या तृतीय वर्षात प्रवेशित सौम्याकुमारी हीने वक्तृत्व स्पर्धेत तृतीय क्रमांक तर रासायनिक अभियांत्रिकी विभागाच्या द्वितीय वर्षाला प्रवेशित आकाश वेलणकर याने एकपात्री स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे यश संपादित केले आहे.

वाल्मिकीनगर येथे काँक्रीटीकरणास सुरुवात

। पनवेल। वार्ताहर।

शेतकरी कामगार पक्षाच्या नगरसेविका डॉ. सुरेखा विलास मोहोकर यांच्या पाठपुराव्याला यश आले असून, प्रभाग क्रमांक १८मधील वाल्मिकी नगर येथील सर्व गल्ली काँक्रिट करण्याचे काम सुरू झाले आहे.

या कामाचे उद्घाटन नगरसेविका डॉ.सुरेखा मोहोकर, झिंझोटकर माऊली व लता म्हात्रे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले.

वाल्मिकीनगर हे पंतप्रधान आवास योजनेंतर्गत आहे. परंतु चालण्याकरिता व्यवस्थित

रस्तेदेखील नसणे, पाऊस पडल्यावर घरात पाणी साचणे अशा अनेक तक्रारी नगरसेविका डॉ.सुरेखा महोकर यांच्याकडे वारंवार येत होत्या.

नागरिकांना मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देणे हे कर्तव्य जाणून नगरसेविका डॉ. मोहोकर यांनी प्रशासनाकडे पाठपुरावा करून वाल्मिकीनगर येथील गल्ली काँक्रीटीकरण करण्याचे काम मार्गी लावून घेतले.

सर्व रहिवासी नागरिकांनी डॉ. मोहोकर यांचे आभार मानून आपापले गल्लीतील इतर सोयीसुविधा विषयीच्या सूचना केल्या व समाधान व्यक्त केले.

म्हैस चोरीचा प्रयत्न फसला

। माणगाव । वार्ताहर ।

तालुक्यातील भाले येथील सागर खानविलकर यांच्या म्हैसीला पहाटेच्या सुमारास पाच चोरट्यांनी इंजेक्शन देऊन चोरून नेण्याचा प्रयत्न केला होता. ही बाब सागर खानविलकर यांच्या लक्षात येताच त्यांनी आरडा ओरड केली. यामुळे म्हैस चोरीचा प्रयत्न मालकाच्या प्रसंग सावधानतेमुळे फसला. याबाबत सागर खानविलकर यांनी माणगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, माणगाव पोलीस ठाण्यात अज्ञात ५ आरोपी विरुद्ध चोरीचा प्रयत्न केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कार्ली शाळेत साकारले अभिनव ग्राम शिक्षा केंद्र

विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी उपक्रम

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

शाळेतील विद्यार्थ्यांना तसेच गावातील तरुण, तरुणी, महिला व ग्रामस्थ यांना अवांतर वाचनाची गोडी लागावी, मुलांच्या ज्ञानात भर पडावी, या उद्देशाने पेण तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कार्ली व प्रथम फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राजीप कार्ली शाळेत अनोखे ग्राम शिक्षा केंद्र उभारण्यात आले आहे. विशेष म्हणजे कोरोना काळात विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी हा उपक्रम प्रभावी ठरत आहे.

जिल्ह्यातील अशा प्रकारचा हा पहिला पथदर्शी प्रकल्प आहे. कार्ली गावचे पोलीस पाटील शांताराम मांडवकर यांच्या हस्ते व शाळा

व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुगंधा घुमे, शाळा प्रमुख मोहन भोईर, सहशिक्षक हरिश्चंद्र तुरे, अंगणवाडी स्वयंसेविका मालती शिर्के, प्रथम फाऊंडेशनचे कल्पेश पाटील यांच्या उपस्थित या केंद्राचे नुकतेच उद्घाटन करण्यात आले.

ग्राम शिक्षण केंद्र म्हणजे केवळ वाचनालय नाही. तर प्रत्येक जिल्हा परिषद शाळेमध्ये अवांतर वाचनासाठी वेगवेगळ्या प्रकारची पुस्तके उपलब्ध आहेत. मात्र, ग्राम शिक्षण केंद्रात ठेवलेली अवांतर वाचनाच्या पुस्तकांचा उपयोग शालेय विद्यार्थ्यांबरोबर गावातील सर्व वयोगटातील नागरिक करू शकतात आणि तसे होत देखील आहे. याचबरोबर वेगवेगळ्या विषयांवर व्याख्याने, कार्यशाळा, प्रदर्शन यासारखे प्रासंगिक उपक्रम शाळेतील शिक्षक विद्यार्थी व ग्रामस्थ यांच्या सहभागाने ग्राम शिक्षण केंद्राच्या मंचावर आयोजित करण्याचे एक उद्दिष्ट आहे, असे शाळा प्रमुख मोहन भोईर यांनी सांगितले.

या अभिनव संकल्पनेला प्रथमचे स्वयंसेवक कल्पेश पाटील यांनी साकार करण्यासाठी पुस्तके देऊन कार्यक्रमाचे नियोजन केले होते. या उपक्रमास विद्यार्थी व गावकऱ्यांचा भरभरून प्रतिसाद मिळत असून, शिक्षण देखील अविरतपणे सुरू आहे.

आरोग्य उपकेंद्राचे उद्घाटन

। खेड । प्रतिनिधी ।

रतनबाई घरडा हॉस्पिटल, लवेल संचलित भरणे प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे उद्घाटन उपविभागीय अधिकारी राजश्री मोरे यांच्या हस्ते तथा जिल्हा परिषद सदस्य अरुण कदम यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

घरडा फाऊंडेशनच्या अनेक सामाजिक उपक्रमांपैकी महत्वाचा उपक्रम रतनबाई घरडा हॉस्पिटल, लवेल असून, या उपक्रमाच्या माध्यमातून कोकणातील जनतेला वैद्यकीय सेवा सुविधा पुरविण्यात येतात. रुग्णालयाने अधिक लोकाभिमुख काम करता यावे, यासाठी खेड शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौकात रुग्णालयाचे आरोग्य उपकेंद्र यापूर्वीच सुरु केले आहे. अशाच प्रकारचा उपक्रम मुंबई-गोवा महामार्गावर भरणे येथील तुलसी कॉम्प्लेक्स मध्ये सुरू करण्यात आला आहे.

या उपक्रमाच्या शुभारंभप्रसंगी उपसभापती जीवन आंब्रे, घरडा फाऊंडेशनचे जे. के. पाटील, विकास जाधव, गोपाळ थंपी, डॉ. फिरोज पटेल, डॉ. मधुरा कणसे, शिवम सोनी व जनसंपर्क अधिकारी विवेक बनकर आदी उपस्थित होते.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे वैजनाथ, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अभय धर्मा तुपे वगैरे ३ यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मिळकतीचे वर्णन

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
५०	२	०-८९-९०	२-९४
	पैकी ०-६९-०० इतके विकत दिलेले क्षेत्र		

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०५-०२-२०२२
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
समीर हरिश्चंद्र लाड
शॉप नं. ०५ अे, वृंदावन कॉम्प्लेक्स,
मुद्रे, कर्जत, रायगड

पान १ वरुन

लतादीदींची प्रकृती अत्यवस्थ

मंगेशकर कुटुंबियांशी कौटुंबिक संबंध असणाऱ्यांनीही ब्रीच कँडी रुग्णालयात धाव घेतली. मात्र, मंगेशकर कुटुंबिय आणि मंगेशकर कुटुंबियांशी संबंधितांनाच रुग्णालयात सोडण्यात येत आहे. इतर कुणालाही प्रवेश दिला जात नाही.

काही दिवसांपूर्वी लता मंगेशकर यांना कोरोनाची लागण झाली होती. त्यासोबतच त्यांना न्यूमोनियाही झाला होता. त्यामुळे त्यांच्यावर उपचार सुरू होते. प्रकृती गंभीर असून त्यांना आयसीयूमध्ये ठेवण्यात आले आहे. तसेच डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरू असल्याची माहिती ब्रीच कँडी रुग्णालयाचे डॉक्टर प्रतीत समदानी यांनी सांगितले. काही दिवसांपूर्वीच त्यांना कोरोनाची व न्यूमोनियाची लागण झाल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्या लवकर बरे व्हाव्यात यासाठी अनेक जण प्रार्थना करत आहे.

शिक्षकांचा लाक्षणिक संप

व राज्य शासन गंभीर नाही. केंद्र सरकारने PFRDA कायदा मंजूर केला आहे. नविन अंशदायी पेन्शन योजना ही योजना अत्यंत धोकादायक आहे. म्हणूनच PFRDA कायदा रद्द करुन सर्वांना जूनी पेन्शन योजना लागू करण्याकरीता देश पातळीवर आंदोलन उभारण्यात आले आहे. राज्य सरकारने सुद्धा राज्यातील सर्व सरकारी, निम सरकारी कर्मचारी व शिक्षक यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी या प्रमुख मागणीसह अन्य प्रलंबित मागण्याकरिता महाराष्ट्रातील १७ लाख कर्मचारी व शिक्षक येत्या २३ व २४ फेब्रुवारी रोजी २ दिवसाचा लाक्षणिक संप करणार आहेत. रायगड जिल्ह्यातील सर्व राज्य सरकारी, निम सरकारी, जिल्हा परिषद कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या संपात सहभागी होणार आहेत.

सर्व सरकारी, निमसरकारी कर्मचारी व शिक्षक यांना अंशदायी पेन्शन रद्द करुन, १९८२ ची जुनी पेन्शन योजना लागू करा, खाजगीकरण, कंत्राटीकरण धोरण रद्द करुन सध्याच्या अंशकालीन व कंत्राटी व बंधपत्रित कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करा, सर्व संवर्गातील रिक्त पदे तात्काळ भरा व ही पदे भरतानाच अनुकंपा तत्वावरील नियुक्त्या विनाअट करा, चतुर्थश्रेणी कर्मचारी यांच्या वारसांना शासकीय नोकरीत सामावून घ्या, चतुर्थ श्रेणी कर्मचारी, जिल्हा परिषद कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न तात्काळ सोडवा, लिपीक वर्गीय कर्मचारी व अन्य कर्मचाऱ्यांचे वेतनश्रेणी त्रुटी दूर करा, कंत्राटी कर्मचारी, कोतवाल, आशा, अंगणवाडी ताई, महिला परिचर सह सर्व कंत्राटी कर्मचारी व शिक्षक यांना किमान वेतन द्या व त्यांना पेन्शन योजना लागू करा, इतर सर्व प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी सर्व संबंधित संवर्ग संघटनेच्या प्रतिनिधींसोबत निर्णायक चर्चा करा या मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले. यावेळी राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे जिल्हा अध्यक्ष संदिप नागे, सरचिटणीस प्रभाकर नाईक, उपाध्यक्ष कोषाध्यक्ष दर्शना पाटील, प्रफुल्ल कानिटकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

दुप्पट पैशाच्या आमिषाने खोपोलीत गंडा

शेअरहॅश नावाचे मोबाईल ॲपवर गुंतवणूक केली होती. सदर ॲपवर रक्कम गुंतवणूक केल्यास ती ४५ ते ५० दिवसात दुप्पट होईल असे आमिष आरोपींनी दाखवले होते. विनय कुमार यांनी दोन वेळा कमी रक्कम गुंतल्या नंतर त्यांना दुप्पट परतावा मिळाला होता. त्यामुळे या गुंतवणुकीला बळी पडून त्याने याने १ लाख ७४ हजार १६ रुपयांची गुंतवणूक केली. त्यानंतर सदर शेअरहॅश नावाचे मोबाईल ॲप तसेच त्या भामट्यांनी मोबाईल नंबर बंद केले. फसवणुक झाल्याचे लक्षात येताच विनय कुमार याने खोपोली पोलीस ठाण्यात तक्रार दिली. याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे भा.दं.वि.कलम ४२० प्रमाणे अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक पोलिस निरिक्षक हरेश काळसेकर हे करीत आहेत.

नितेश राणेंची सोमवारी सुनावणी

संग्राम देसाई यांनी आपली बाजू मांडली होती. त्यावर न्यायालयाने शनिवारी दुपारी यावर सुनावणी घेऊन निर्णय घेण्यात येईल, असे सांगितले होते. त्यानुसार राणेंचे वकील सतीश मानेशिंदे दुपारी न्यायालयात हजर झाले होते. परंतु या प्रकरणी शासनाने नियुक्त केलेले विशेष सरकारी वकील प्रदीप घरत यांनी ई-मेलद्वारे अर्ज करीत वेळ मागितला. त्यामुळे न्यायालयाने ही सुनावणी पुढे ढकलली. आता ही सुनावणी सोमवारी होणार आहे.

शासनाने नियुक्त केलेले विशेष सरकारी वकील प्रदीप घरत यांनी ई-मेलद्वारे अर्ज करीत बचाव पक्षाच्यावतीने अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्या न्यायालयात दाखल केला आहे. या न्यायालयात ही सुनावणी न घेता प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयात घेण्याची मागणी केली होती. परंतु सरकारी वकील घरत यांनी केलेल्या अर्जावर स्वाक्षरी नव्हती. तो विहित नमुन्यात नव्हता. त्यामुळे हा अर्ज फेटाळण्याची मागणी राणे यांच्या वकिलांनी केली. त्यानंतर सायंकाळी ४ वाजेपर्यंत अर्ज परिपूर्ण करण्यास मुदत देण्यात आली होती. तरीही वकील घरत यांनी त्रुटी दूर केल्या नाहीत. त्यानंतर हा अर्ज प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयात देण्यात आला. यावेळी या न्यायालयाने जामीन अर्जावर सोमवारी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयात सुनावणी होईल. तसेच अपूर्ण दिलेल्या अर्जातील त्रुटी दूर करण्यास सोमवारी दुपारी २ वाजेपर्यंत वेळ दिला आहे.

एसटी बंद असल्याने प्रवाशांचे हाल

खासगी रिक्षा व मिनीडोअरचालकांनी आपले बस्तान बसवले आहे. प्रशासनाचा कुठलाही अंकुश नसल्यामुळे त्यांच्याकडून मनमानी भाडे आकारून प्रवाशांची लूट करण्यात येत आहे. दळणवळणाचे दुसरे कुठले साधन नसल्यामुळे अडीच महिन्यांपासून सर्वसामान्य प्रवासी भरडला जात आहे. तालुक्याचे ठिकाण असल्यामुळे ग्रामीण भागातून अलिबाग शहरात मोठ्या प्रमाणावर प्रवाशांची वर्दळ असते. यामध्ये नोकरदार, विद्यार्थी व वैद्यकीय उपचार घेण्यासाठी येणाऱ्यांची संख्या मोठी आहे. परंतु एसटी बंद असल्यामुळे ग्रामीण प्रवाशांना मिनीडोअर किंवा रिक्षाने प्रवास करण्याशिवाय पर्याय नाही. याचाच फायदा घेत मनमानी भाडे आकारले जाते. त्यामुळे लालपरी लवकरात लवकर सुरू व्हावी, अशी अपेक्षा प्रवाशांची आहे. अनेकांना पर्याय नसल्याने त्यांनी खासगी वाहतुकीचा आधार घेतला आहे.

याचा मोठा फटका अलिबाग-पनवेल सेवेवर झाला आहे. सर्व प्रशासकीय कार्यालये अलिबागमध्ये आहेत. त्यामुळे पनवेल परिसरातील अनेक नागरिकांना अलिबागला प्रशासकीय कामासाठी जावे लागत आहे. एसटी बंद असल्यामुळे अलिबाग-पनवेल खासगी वाहतूकदारांनी भाडे दुपटीने वाढल्यामुळे नागरिकांना भुर्दंड सहन करावा लागतो. इंधन दरवाढीमुळे भाड्यात वाढ संधीचा गैरफायदा घेत नसून सीएनजी गॅस व डिझेलच्या किमती वाढल्यामुळे नाइलाजास्तव प्रवासी भाड्यात वाढ करावी लागली.

प्रशासकीय कामासाठी अलिबागला जावे लागत असल्याने गैरसोय होत आहे. पूर्वी मिनीडोअरचे भाडे शंभर रुपये होते, परंतु एसटी बस बंद असल्याने ते दोनशे रुपये झाले आहे. नाइलाजाने वाढीव भाडे भरावे लागत आहे.

- विजय पाटील, प्रवासी पनवेल

आता सुतारवाडीतून नव्हे, माणगावातून चालणार कारभार

माजी आ. पंडित पाटील यांनी लगावला टोला

। माणगाव । वार्ताहर ।
माणगाव नगरपंचायतीच्या निवडणुकीत सत्ताधाऱ्यांच्या विरोधात माणगाव विकास आघाडीने १७ पैकी ९ जागांवर विजय मिळवित जनाधार मिळविला आहे. त्यामुळे आता पुढील काळात नगरपंचायतीचा कारभार सुतारवाडीतून नव्हे, तर माणगाव नगरपंचायतीतून चालणार असल्याचा टोला शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार पंडित पाटील यांनी कोणाचेही नाव न घेता लगावला आहे.

माणगाव नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदाची निवडणूक येत्या १० फेब्रुवारीला होत असून, या नगराध्यक्षपदासाठी माणगाव विकास आघाडीचे शिवसेनेचे नवनिर्वाचित नगरसेवक ज्ञानदेव पवार यांनी शुक्रवार, दि.४ फेब्रुवारी रोजी आपला नामनिर्देशन अर्ज दाखल केला. त्यानंतर शनिवार, दि.५ फेब्रुवारी रोजी दुपारी पंडित पाटील यांनी माणगाव येथे ज्ञानदेव पवार यांच्या निवासस्थानी येऊन त्यांना नगराध्यक्षपदाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रसार माध्यमांजवळ बोलताना पंडित पाटील यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली.

यावेळी ॲड. राजीव साबळे, दक्षिण रायगड शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल नवगणे, मोर्बा येथील शेकापचे ज्येष्ठ नेते अस्लमभाई राऊत, शेकापचे तालुका चिटणीस रमेश मोरे, माजी नगरसेविका अंजली पवार, माजी स्वीकृत नगरसेवक नितीन बामगुडे, विरेश येरुणकर आदींसह महाविकास आघाडीचे नवनिर्वाचित नगरसेवक व कार्यकर्ते उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले की, रायगड जिल्ह्याच्या विकासासाठी शेकापचे योगदान आहे. तसेच स्व. प्रभाकर पाटील, माजी आमदार स्व. अशोकदादा साबळे यांचेही मोठे योगदान आहे. आजही माणगावचे नाव अशोकदादा साबळे यांच्या नावाने निघत आहे. माणगावच्या विकासासाठी त्यांची विशेष तळमळ होती. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून त्यांचे सुपुत्र व माझे एकवेळचे जिल्हा परिषदेतील सहकारी ॲड. राजीव साबळे हे काम करीत आहेत. ॲड. साबळे यांना प्रशासनाचा भरपूर अनुभव आहे. त्यांच्या अनुभवाचा फायदा होणारे नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार व त्यांच्या सर्व सहकारी नगरसेवकांनी घ्यावा. शेवटी माणगाव विकास आघाडीच्या सर्व नवनिर्वाचित नगरसेवक, नगरसेविका यांना शुभेच्छा दिल्या.

नगरपंचायतीमध्ये शेकापने शिवसेनेला दिलेल्या पाठिंब्यामुळे आगामी काळात दक्षिण रायगड जिल्ह्यात होणाऱ्या निवडणुकांमध्ये याचे पडसाद उमटणार असून, जनतेच्या मनातील आघाडी येणाऱ्या निवडणुकीत पहावयास मिळणार आहे, असे पंडित पाटील यांनी सांगितले. यापुढे शहराचा नियोजनबद्ध विकास होईल. शेतकरी कामगार पक्ष ज्याला पाठिंबा देतो. तोच आमदार, खासदार होतो. एक चांगले नेतृत्व ज्ञानदेव पोवार यांच्या रुपाने माणगावकरांना मिळाले आहे. फक्त पैशाने लोकांची मने जिंकता येत नाहीत, हे ॲड. राजीव साबळे यांनी या निवडणुकीत दाखवून दिलेले आहे, असेही पाटील यांनी स्पष्ट केले.

> माणगाव नगरपंचायतीच्या निवडणुकीत शेवटच्या फेरीत ॲड. साबळे यांनी विजयी चौकार मारला. आता माणगावमधील नगरपंचायतीच्या या यशामुळे येणाऱ्या काळात दक्षिण रायगडातील राजकीय समीकरणे बदलल्याशिवाय राहणार नाही, याचा मला ठाम विश्वास आहे.
> – पंडित पाटील, शेकाप नेते

म ह त्त्वा चे

कारचालकावर गुन्हा दाखल

। पनवेल । वार्ताहर ।

कामोठे से-१९ येथील एका सोसायटीसमोरील मैदानात झोपलेल्या भटक्या कुत्र्याला कारखाली चिरडल्याप्रकरणी कारचालकाविरुद्ध कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत हकीकत अशी की, कामोठे से-१९ मधील साईदर्शन सोसायटीत राहणारी प्रणाली वाघमारे, नावाची तरुणी दुपारच्या सुमारास घरातील बाल्कनीमध्ये बसलेली असतांना समोरील बाजुच्या ग्राऊंडवर एक वेगॅन कार क्र (एमएच ०३/बीसी ६३१४) वळण घेत असताना तेथे झोपलेल्या कुत्र्याला चिरडण्याचा प्रकार घडला होता.

'दफनभूमीसाठी भूखंड देणार'

। पनवेल । वार्ताहर ।

'सिडको'द्वारे खारघरमधील भूखंड पनवेल महापालिकाकडे हस्तांतरण करण्याची प्रक्रिया सुरु आहे. भूखंडांचे हस्तांतरण होताच खारघरमध्ये असलेल्या दाऊदी बोहरा समाजासाठी दफनभूमीकरिता भूखंड दिला जाईल, असे आश्वासन आयुक्त गणेश देशमुख यांनी दिले आहे. खारघर परिसरात दाऊदी बोहरा समाज मोठ्या संख्येने असून, निधन झालेल्या व्यक्तीला अंत्यसंस्कारासाठी मृतदेह कोपरखैरणे किंवा मुंब्रा येथे घेऊन जावे लागते. त्यामुळे खारघरमधील दाऊदी बोहरा समुदायाला गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.

जिओ नेटवर्क ठप्प

। उरण । वार्ताहर ।

जिओचे नेटवर्क शनिवारी दुपारपासून ठप्प झाले होते. साधारपणे १२.१५ वाजल्यापासून जिओचं नेटवर्क बंद पडले. काही तांत्रिक अडचणींमुळे सेवा बंद झाल्याचे सांगण्यात आले.कंपनीचे कर्मचारी दुरुस्तीचे काम करत असून, लवकरच सेवा सुरळीत होईल, असं कंपनीकडून सांगण्यात आले. परंतु, याचा मोठा फटका ग्राहकांना बसला. नेटवर्क ठप्प असल्याने कॉलिंग आणि इंटरनेट सेवा बंद झाली होती. मात्र, हा बिघाड नेमका कशामुळे झाला, याची माहिती अद्याप समजू शकलेली नाही. तसेच रिलायन्स जिओ कंपनीकडूनही यासंदर्भात कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. नेटवर्क सुरु होण्याची वाट पाहण्याखेरीच ग्राहकांच्या हाती काहीच नव्हते.

दामत येथील अवैध कत्तलखान्यावर कारवाई

२१५ किलो गोमांससह जिवंत जनावरे ताब्यात

। नेरळ । वार्ताहर ।

रायगड पोलिसांच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडून कर्जत तालुक्यातील दामत गावात सुरू असलेल्या अवैध कत्तलखान्यांवर धाड टाकण्यात आली. त्यावेळी गोमास विकणाऱ्या एकास अटक केली असून, यावेळी अर्धवट कापण्यात आलेल्या चार गायींचे २१५ किलो गोमांस जप्त करण्यात आले. तर, कत्तलीसाठी आणलेली काही जिवंत जनावरे ताब्यात घेण्यात आली असून, त्यांना गोशाळेत पाठविण्यात आले आहे. पोलिसांच्या धाडीमुळे दोन आरोपी पळून गेल्याची माहिती मिळत आहे.

कर्जत तालुक्यातील नेरळ पोलीस ठाणे हद्दीतील दामत गावात अवैध गोमास विक्री आणि अवैध कत्तल केली जात असल्याची खात्रीलायक माहिती गुप्तचार यंत्रणेकडून रायगड जिल्हा पोलिसांच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे अधिकारी पाटील यांना मिळाली होती. त्याअनुषंगाने दि. ४ फेब्रुवारी रोजी पहाटेच्या सुमारास स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने नेरळ पोलीस दामत गावात घेराबंदी करून धाड टाकली. यावेळी १९ वर्षीय आरोपी उसामा वसीम नजे हे त्यांच्या घरासमोरील मोकळ्या जागेत हत्यार्यासोबत चार गायी ह्या अर्धवट कटिंग केलेल्या ठिकाणी सापडून आला होता. तर काही गोमांस हे कापून लटकवलेले आढळले होते. याशिवाय काही अंतरावर एका बंदिस्त खोलीत कत्तलीसाठी आणलेली आठ जिवंत जनावरे आढळून आली. तेथे जनावरे वाहून नेण्यासाठी आणलेली पिकअप टेम्पो सापडून आल्याने जिवंत जनावरे आणि टेम्पो स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने ताब्यात घेतली.

रायगड स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे अधिकारी ठाकूर, श्रीवर्धन, चिमटे, मोरे, म्हात्रे यांसह सर्व टीमने ही कारवाई केली आहे. यामध्ये नेरळ पोलिसांनीदेखील सहकार्य केले आहे. एकूणच पळून गेलेल्या व्यक्तीचा पोलीस शोध घेत आहेत.

उपाध्यक्षपदी भानुदास जांभळे

। रसायनी । वार्ताहर ।

रसायनीतील चांभार्ली येथील भानूदास अनंत जांभळे यांची ऑल इंडिया पोलीस जनसेवा संघटनेच्या खालापूर तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली असून, याबाबत त्यांना राष्ट्रीय संस्थापकांच्या मार्गदर्शनाखाली निवडपत्र व ओळखपत्र देण्यात आले. चांभार्ली येथील भानूदास जांभळे यांना सामाजिक कार्याची आवड असून, नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी ते नेहमीच प्रयत्नशील असतात. त्यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

चिरनेर-कळंबुसरे रस्त्याचे भिजत घोंगडे

सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

। जेएनपीटी । वार्ताहर ।

उरण तालुक्यातील चिरनेर-कळंबुसरे या महामार्गावरील बायपास रस्त्याच्या दुरुस्तीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम जवळ जवळ १५ वर्षे रेंगाळत पडत असल्याने मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. तरी सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्याच्या दुरुस्तीचे काम तात्काळ हाती घ्यावे, अशी मागणी आम्ही उरणकरच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

जेएनपीटी बंदराच्या माध्यमातून उरण पूर्व विभागातील गावांचा औद्योगिकदृष्ट्या झपाट्याने विकास होत आहे. त्यात बांधपाडा, कोप्रोली, सारडे, पिरकोन, कळंबुसरे, मोठी जुई, चिरनेर, विंधणे, दिघोडे, वेश्वी ग्रामपंचायत हद्दीत देश-परदेशांतील आयात-निर्यात होणाऱ्या मालाची साठवणूक करणाऱ्या कंटेनर यार्डचे जाळे झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे कळंबुसरे गावाच्या मध्यभागातून जाणाऱ्या अरुंद रस्त्यावरुन अवजड वाहनांची रेलचेल ही रहिवाशांच्या अपघातास कारणीभूत ठरत आहे. यावर ठोस उपाययोजना करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने २००६ मध्ये कळंबुसरे गावातील स्मशानभूमी ते मोठी जुई बसस्थानक या परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनी संपादित करण्याचा निर्णय हाती घेतला.तसेच दीड किलोमीटरचा कळंबुसरे गावाच्या बाहेरून बायपास रस्त्याचे काम हाती घेतले.

परंतु, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कुचकामी धोरणामुळे आजही बाधित शेतकऱ्यांना संपादित जमिनीच्या मोबदल्यापासून वंचित राहावे लागले आहे.

नागाव येथे 'मासा'चे चित्रीकरण

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील नागाव येथे मराठी चित्रपट 'मासा'च्या चित्रीकरणाला शुभारंभ करण्यात आला आहे.

प्रज्ञा दुगल आणि तेज दुगल यांची निर्मित आणि संदेश कुलकर्णी लिखित या चित्रपटाचे दिग्दर्शन प्रसिद्ध नृत्य दिग्दर्शिका फुलवा खामकर करीत आहेत.

या चित्रपटात अमृता सुभाष यांची व इतर कलाकारांच्या भूमिका आहेत. नागाव ग्रामपंचायतीचे सरपंच निखिल मयेकर, सदस्य हर्षदा मयेकर मुहूर्तप्रसंगी आवर्जून उपस्थित होते.

साळाव-मुरुड रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य

वाहनचालक व प्रवासीवर्ग हैराण तातडीने खड्डे बुजवा : मिनिडोअर-रिक्षा चालकांची मागणी

। कोर्लई । वार्ताहर ।

साळाव-मुरुड रस्त्यावर गेल्या अनेक महिन्यांपासून विहूर पूल, नवीन मजगाव, उसरोली फाटा, नांदगाव मच्छिमार्केट, स्टेट बँक, वाघोबा मंदिर, दांडा, काशिद बीच, यू-टर्न, बोर्ली स्टॅण्ड, कोर्लई, साळाव पूल-चेकपोस्ट नाका रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य आहे. यामुळे पर्यटक, वाहनचालक व प्रवासीवर्ग हैराण झाला असून, तातडीने खड्डे बुजविण्यात यावेत, अशी मागणी मिनिडोअर-रिक्षा चालक व प्रवासी वर्गातून जोर धरीत आहे.

खड्ड्यांच्या त्रासानंतर गेल्या अनेक दिवसांपासून साळाव-मुरुड रस्त्यावर अनेक ठिकाणी असलेल्या झाडाझुडुपांचा विळखा तसेच काही ठिकाणी खाली आलेल्या झाडांच्या फांद्या वाहतुकीला अडथळा ठरत असून, विहूर, मोरे ते मजगाव, उसरोली फाटा, नांदगाव बाजार ते बाजारपेठ, वाघेश्वर नगर, दांडा, सर्वे, काशिद, काशिद यू-टर्न, बारशिव, बोर्ली स्टँड, कोर्लई भागात रस्त्यावर खड्ड्यांमुळे प्रवासी व वाहनचालक यांना त्रास व हाल सहन करावा लागत आहे. याकडे संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षाबाबत नाराजीचा सूर दिसून येत आहे.

क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- WORK FROM HOME ९५०३०५८६२४
- ड्रायव्हर हवा आहे. Pickup/407 टेम्पोवर अनुभवी ड्रायव्हर हवा आहे. १४०००/१५००० गोविंद गोपाळ अँड कंपनी झिराड– ८००७८९३२३२/९४२१९५४३४८
- डिश टीव्ही कंपनीसाठी 'Technician' आहेत. पगार ७०००–९००० रुपये स्वत:ची बाईक असावी. Contact- 7448202022/7721931234
- पुरुष व महिला कामगार आवश्यक संपर्क– ९६०४५२०२६२, ८२०८८९३३२३
- वधु–२, वय २३/२६, बारावी /B.A, आई वडिलांचे अपघाती निधन, शेती ४ ऐकर, मुली मामाकडे राहतात. ९९७५६२८६४४/९९७५४९२३४४.
- पाहिजेत सातघर–अलिबाग येथील साईटकरिता रिअल इस्टेट सेल्स एक्झिक्युटीव्ह, २ ते ५ वर्षांचा अनुभव, ग्रॅज्युएट असणे आवश्यक. संपर्क : ७९७७३१४५६०
- पाहिजेत स्टाफ नर्स जन्नावार हॉस्पिटल, बाय पास रोड चेंढरे, अलिबाग. ९४२३८९०३१०

जाहिरातीसाठी संपर्क
☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

नेरळमधील विकासकामांसाठी अडीच कोटींचा निधी

। नेरळ । वार्ताहर ।

नेरळ ग्रामपंचायतीचे माजी सरपंच भगवान चंचे यांनी ग्रामपंचायत हद्दीतील दहा रस्त्यांची आणि दोन गार्डनचे सुशोभिकरण करण्याचे काम जिल्हा परिषदेमधून मंजूर करून आणले आहे. दरम्यान, जि.प.चे उपाध्यक्ष सुधाकर घारे यांनी विकासकामांसाठी दोन कोटी ६५ लाखांचा निधी मंजूर केला आहे.

नव्याने मंजूर झालेली रस्त्यांची कामे ही नेरळ ग्रामपंचायत मधील मातोश्री नगर, राजेंद्रगुरु नगर भागातील आणि निर्माणनगरी भागातील असून, राजेंद्रगुरु नगर आणि मातोश्री नगर येथील गार्डन विकसित करण्याचे कामदेखील त्यात समाविष्ट आहे. नेरळ विकास प्राधिकरण मधून मातोश्रीनगर येथील कुलकर्णी निवास-अष्टविनायक अपार्टमेंट या ३५० मीटर लांबीचा रस्ता बनवला जाणार आहे. मातोश्री नगरमधील ओम व्हीला ते बाबू राणे निवासस्थान हा रस्ता दोन टप्प्यात ६१ लाख खर्चून बनवला जाणार आहे. तर, त्याच भागातील साटम बंगलो ते मुख्य रस्ता आणि स्वामी सदन ते सारा बंगला हा अंतर्गत रस्ता मंजूर झाला आहे. नेरळ पूर्व भागातील गंगानगर येथील अंतर्गत रस्ता बनविला जाणार असून, निर्माण नगरीमधील मुख्य रस्त्याला ३५ लाख निधीमधून गटारे बांधण्याचे काम मंजूर झाले आहे. गावातील ब्राम्हण आळी येथील अंतर्गत रस्त्याचे १७ लाख खर्चून काँक्रिटकरण केले जाणार असून, राजेंद्रगुरु नगर येथील गार्डन विकसित करण्यासाठी २० लाखांचा निधी मंजूर आहे. तर, मातोश्री नगर मधील गार्डन २५ लाख खर्चून विकसित केले जाणार आहे.

अलिबाग शास्त्रीनगर येथे शून्य कचरा कार्यक्रम

। अलिबाग । वार्ताहर ।

'स्वच्छ अलिबाग, सुंदर अलिबाग' या अभियानांतर्गत अलिबाग नगरपरिषद व ईकोसत्व ईन्व्हारमेंट सोल्यूशन प्रा.लि. यांच्या संयुक्त विद्यमाने व द. इंक्युबेशन नेटवर्क व सेकंड म्युस यांच्या सहकार्याने तसेच मुख्यधिकारी अंगाई साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली शास्त्रीनगर येथे माझी वसुंधरा अभियानात स्वच्छता क्वीन, शून्य कचरा कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी माजी नगरसेवक अनिल चोपडा, माजी नगरसेविका शैला भगत व माजी नगरसेविका नईमा सय्यद, प्रतिष्ठित नागरिक अफजल सय्यद परिसरातील नागरिक, घंटागाडी चालक शैलेश गायकवाड, उमेश वाटकर तसेच इकोसत्व प्रतिनिधी संतोष राखेमल्लू, नदीम खान, रेश्मा ढावरे, पूजा पिंगळे उपस्थित होते.

सर्वप्रथम इकोसत्व प्रकल्प प्रमुख नदीम खान यांनी उपस्थित नगरसेवक तसेच मान्यवरांचे स्वागत करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. तसेच इकोसत्व प्रतिनिधी रेश्मा ढावरे यांनी महिलांना घरातून निघणाऱ्या ओल्या कचऱ्यापासून कंपोस्टिंग कसे करावे, याविषयी सविस्तर माहिती दिल. त्यानंतर महिलांचे वेगवेगळे खेळ घेण्यात आले. या स्पर्धांमध्ये अश्विनी पवार, दर्शना लाते यांनी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला.

रस्त्याची दुरवस्था

। चौल । प्रतिनिधी ।

अलिबाग-रेवदंडा मुख्य रस्त्यावर ठिकठिकाणी मोठ मोठे खड्डे पडल्याने रस्त्याची दुरवस्था झाली आहे. आक्षी पूल, रायवाडी, नागाव-हटाळे, खारगल्ली, पालवफाटा, रेवदंडा परिसर आदी ठिकाणच्या रस्त्याची खड्ड्यांमुळे चाळण झाली आहे. या रस्त्यावरुन दररोज प्रवास करणाऱ्या प्रवाशांसह वाहनचालकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे.

संविधान गौरव परीक्षा प्रमाणपत्र वाटप कार्यक्रम

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

आपल्या संविधानाची खऱ्या अर्थाने सगळ्यांना ओळख व्हावी या हेतूने संविधान गौरव परीक्षा २०२१ चे आयोजन रायगड जिल्हा परिषद शाळा तोंडरे येथे २७ नोव्हेंबर २०२१ रोजी करण्यात आले होते. त्यावेळी शाळेतील इयत्ता ६ वी ते ८ वीच्या ३२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विजेत्यांना संविधान गौरव परीक्षा प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

या परीक्षेत शाळेच्या विद्यार्थ्यांनी चांगले यश मिळविल्याबद्दल मुख्याध्यापक श्री. वाघ यांनी मुलांचे कौतुक करून आपले विचार मांडले. यावेळी वर्गशिक्षक राजेश मोकल, वसंत मोकल, राजेंद्र खामकर आणि बालाजी जकाकूरे यांनी मनोगत व्यक्त केले. ही परीक्षा पार पाडण्यासाठी प्रभात नाईक यांची या केंद्राचे केंद्रप्रमुख म्हणून मुंबईच्या तळवटकर प्रतिष्ठान या संस्थेकडून नियुक्ती करण्यात आली होती. यावेळी श्री. खामकर, जकाकुरे आणि बोरकर यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रभात नाईक यांनी, तर आभार अतुल बोरकर यांनी मानले. यावेळी महेंद्र जोशी, तुकाराम शिंदे, मोमीन मॅडम, विद्या गावंड, कल्पना गावंड, संध्या म्हात्रे उपस्थित होत्या.

मुस्लिम तरुणांनी जागविला सर्वधर्मसमभाव

माघी मासोत्सवात सर्व फेरीवाले व विक्रेत्यांना केले अन्नदान

। सुधागड-पाली । वार्ताहर ।

पालीतील बल्लाळेश्वर देवस्थानच्या माघी मासोत्सवासाठी विविध ठिकाणांवरून विक्रेते व फेरीवाले आले आहेत. या सर्वांना पालीतील मुस्लिम तरुणांनी अन्नदान करून सर्वधर्मसमभाव देणारा विधायक उपक्रम राबविला.

कोरोनामुळे आर्थिक घडी विस्कटलेल्या या विक्रेत्यांना मदत करावी व त्यांना जेवण द्यावे, या उद्देशाने हे सर्व मुस्लिम तरुण पुढे आले. त्या अनुषंगाने पालीतील मुस्लिम समाज आणि युवा मुस्लिम कमिटीच्या तरुणांनी पदरमोड करून हा विधायक उपक्रम राबविला. प्रत्येक विक्रेत्याकडे जाऊन त्यांना तयार जेवणाचे पाकीट देण्यात आले. यामुळे गोरगरीब विक्रेते समाधानी झाले. गणेशोत्सवानिमित्त मुस्लिम समाजाने राबविलेल्या या अनोख्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

यावेळी इरफान शेख, तोहिद पठाण, सलमान लड्डू, शाद पानसरे, नदीम पठाण, अमान अत्तार, आसिफ खान, सईद महाडकर, जिशान पठाण, सुफियान महाडकर, फैसल महाडकर, मुस्लिम युवा मित्र मंडळ, सर्व सदस्य, पदाधिकारी उपस्थित होते.

■ विक्रेत्यांना जेवणाची पाकिटे देताना मुस्लिम तरुण.
(छायाचित्र : गौसखान पठाण)

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. आपला वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस तसेच आपल्या नातेवाईक-मित्रांच्या स्मृतिदीनी आपण समाजातील तळागाळातील लोकांना अन्नदान करावे असे आवाहन कृषीवल आपणाला करीत आहे. अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दुर्गम भागातील राहणारे आदिवासी, मोलमजुरी करणारे, गोर-गरीब रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येत असतात. ज्यांच्याकडे येण्या-जाण्याचे देखील पुरेसे पैसे नसतात आणि यात घरातला कमवता पुरुष जर आजारी असेल तर या लोकांची मोठी आर्थिक कुचंबणा होत असते. यासाठी या ट्रस्टच्या वतीने जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात फक्त रुग्णांसाठी जेवणाची सरकारी सोय असते, त्यांच्या सोबत रुग्णालयात राहणाऱ्या नातेवाईकांना जेवण मिळत नाही. अशा परिस्थितीत रुग्णाच्या नातेवाईकाला फार कठीण परिस्थितीला तोंड देऊन पोटाची खळगी भरावी लागते किंबहुना काही वेळेला उपासमारीचीही वेळ त्यांच्यावर ओढावते. त्यांच्या या अडीअडचणी लक्षात घेऊन श्री कच्छी जैन भवनने असाह्य रुग्णाच्या एका नातेवाईकाला एक वेळचे पूर्ण जेवण देण्यास सुरुवात केली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

श्री. हर्षल वसंत वीरा, वाढदिवसानिमित्त, पाचगणी

महत्त्वाचे

हरिश्चंद्र ठाकूर यांना मातृशोक

। पेण । वार्ताहर ।

सोनखार गावचे हरिश्चंद्र ठाकूर यांच्या मातोश्री बामुबाई ठाकूर यांचे अल्पशा आजाराने

निधन झाले. त्यांच्या पश्चात आठ मुले व एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. बामुबाई या सात्विक विचारांच्या असल्याने सोनखार गावाच्या विकासात त्यांचा मोलाचा वाटा होता. महत्त्वाची बाब म्हणजे, स्वतः अशिक्षित असूनही त्यांनी आपल्या आठही मुलांना उत्तम शिक्षण दिले. त्यांच्या पार्थिवावर सोनखारच्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

वीजमीटरचे अचूक रीडिंग घ्या

अन्यथा कठोर कारवाई करणार

। मुंबई । प्रतिनिधी ।

कोणत्याही परिस्थितीत प्रत्येक वीजमीटरचे रीडिंग १०० टक्के अचूक झालेच पाहिजे. चुकीच्या वीजबिलांमुळे ग्राहकांना होणारा मनस्ताप व महावितरणच्या महसुलाचे नुकसान अजिबात सहन केले जाणार नाही.

मीटरचे अचूक रिडींग घेण्यात हयगय करणाऱ्या मीटर रीडिंग एजन्सीज विरुद्ध महसुलाचे नुकसान केल्याप्रकरणी फौजदारी कारवाईसोबतच संबंधित कर्मचाऱ्यांविरूध्द कठोर कारवाई करण्यात येईल असा निर्वाणीचा इशारा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी दिला.

राज्यभरातील क्षेत्रीय प्रादेशिक संचालक, मुख्य अभियंते, अधीक्षक अभियंते, कार्यकारी अभियंते आणि उपविभागीय अधिकारी यांचेसमवेत मुख्यालयातून व्हीडीओ कॉन्फरसिंगद्वारे घेतलेल्या बैठकीत ते बोलत होते.

यावेळी महावितरणचे संचालक संजय ताकसांडे, कार्यकारी संचालक योगेश गडकरी उपस्थित होते.

महावितरणच्या क्षेत्रीय

अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधताना सिंघल म्हणाले की, ग्राहकांनी वापरलेल्या युनिटप्रमाणेच वीजबिलाची आकारणी करण्याची जबाबदारी महावितरणची आहे. त्यासाठी फोटो मीटर रीडिंगसाठी स्वतंत्र मोबाईल अप तयार करण्यात

महावितरणाचा इशारा

आले आहे, व रीडिंग घेण्याची प्रक्रिया सोपी व वेगवान केलेली आहे. प्रत्येक मीटरच्या रीडिंगसाठी एजन्सीजना चांगला मोबदला दिला जातो. तरीही मीटरचे चुकीचे रिडींग घेणे व फोटो अस्पष्ट असणे, रीडिंग न घेता आल्याचा शेरा देणे आदी प्रकार होत असल्याचे दिसून येत आहे.

शहरी व ग्रामीण भागातील सर्व ग्राहकांच्या मीटरचे रीडिंग अचूकतेने घेतले पाहिजे. यामध्ये हयगय केल्यास महावितरणच्या महसूलाचे नुकसान होते.

सोबतच बिल दुरूस्तीचा वीजग्राहकांना नाहक मनस्ताप व त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे केवळ एक नोटीस पाठवून रीडिंग एजन्सी व त्यांच्या कर्मचाऱ्यांना काळ्या यादीत टाकण्याचा निर्णय नुकताच घेण्यात आला आहे.

या फेब्रुवारी महिन्यात अचूक मीटर रिडींग घेण्यात अपयशी ठरलेल्या सर्व संबंधितांविरूध्द कारवाई करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

योग्य भाव व गुणवत्तेची हमी

पटेल ज्वेलर्सचा नवीन फंडा

। अलिबाग । वार्ताहर ।

पटेल ज्वेलर्स या पनवेलमधील छोट्याशा दुकानापासून ते पटेल ज्वेलर्स हा ज्वेलरी शोरूमच्या चेन चा ब्रांड कसा झाला या मागे विश्वास हीच परंपरा हे ब्रीद वाक्य आहे.

पनवेलच्या जोशी आळी येथे अनेक छोटी-छोटी ज्वेलर्सची दुकाने होती त्यामुळे या गल्लीला पनवेलचा झवेरी बाजार हे नाव पडले या सर्व दुकानांच्या गर्दीमध्ये १९९२ साली पटेल ज्वेलर्स या नावाने मगनभाई पटेल व प्रफुल्ल पटेल व नवनीत पटेल यांनी १५० फुटांचे ज्वेलरीचे दुकान सुरू केले. हे छोटे दुकान अल्पावधित प्रसिध्द झाले. पटेल बंधुचे अदबशीर बोलणे, सेवेतील तत्परता, सो न्याची शुध्दता, पारदर्शक व्यवहार यामुळे होणारी माऊथ पब्लिसिटी हे यामागचे कारण आहे.

ग्राहकांची संख्या वाढल्यामुळे जागा अपुरी पडत होती. तेव्हाच याच दुकानाचा विस्तार करून याचे रूपांतर शोरूम मध्ये केले. ग्राहकांनी यांला चांगलाच प्रतिसाद दिला. परंतु थोड्या वर्षातच आणखीन बदल झाले. ग्राहकाला अग्रभागी ठेवून भव्य शोरूम बनवली जात होती.

आकर्षक रोषणाई, आधुनिक बिलींग, सीसीटीव्ही, ए.सी, ग्राहकांना बसण्यासाठी जागा हे सर्व नवीन शोरूममध्ये अपेक्षित होते. काळाची पावले ओळखून मगनभाई यांनी आपल्या शोरूमचे नुतूनीकरण केले. जेथे त्यांचे छोटे दुकान होते, येथे पहिल्या मजल्यासहीत ७००० फुटांचे भव्य शोरूम आधुनिक सुविधांसहित पनवेल, रायगड व नवी मुंबईवासियांसाठी खुले केले. तेथे आत्ता दुसऱ्या व तिसऱ्या मजल्याच्या वाढीव जागेत शोरूमचे काम चालू असून, लवकरच १२००० फुटांची भव्य शोरूम ग्राहकांसाठी खुली होईल.

आज पटेल ज्वेलर्समध्ये सर्व काही एकाच छताखाली मिळते. लेटेस्ट व्हरायटीमध्ये सोन्या-चांदीच्या दागिन्यांची असंख्य डिझाईन्स, पारंपरिक दागिने, हॉलमार्क दागिने, तुमच्या डिझाईन्सनुसार बनऊन मिळणारे दागिने, ब्रँडेड हिऱ्याचे दागिने, प्लॅटिनम दागिने, सोन्या-चांदीमध्ये देवांच्या मूर्ती, दागिने व पूजेचे साहित्य, दागिने पोलिश, दागिने रिपेरिंग, दागिना ठेवणे व घेणे हे सारे पटेल ज्वेलर्सच्या सर्व शोरूममध्ये उपलब्ध आहे. कमीत कमी व योग्य भावात फिक्स रेट या धोरणाचे आमच्या ग्राहकांनीसुद्धा स्वागत केले आहे. आता यापुढे पटेल ज्वेलर्सच्या सर्व शोरूममध्ये खरेदी करताना ग्राहकांच्या मनात किमतींविषयी कोणतीही शंका नसेल.

ताम्हाणी घाटातील प्रवास पर्यटकांसाठी ठरते डोकेदुखी

। माणगाव । वार्ताहर ।

आंतरराष्ट्रीय दिघी बंदराशी जोडणाऱ्या माणगाव-ताम्हाणी-पुणे मार्गावरील ताम्हिणी घाटाची संरक्षक भिंती धोकादायक आहेत. त्याचबरोबर हा रस्ता अरुंद व अवघड वळणाचा असल्यामुळे पश्चिम महाराष्ट्रासह मराठवाडा येथून येणाऱ्या पर्यटक, प्रवाशांना या मार्गावरून प्रवास करताना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. येथील धोकादायक वळणे, अरुंद रस्ता अपघाताला आमंत्रण देत आहे. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणारा प्रवासी असुरक्षित आहे. त्यामुळे माणगाव पुणे मार्गावरील ताम्हाणी घाटातील प्रवास पर्यटकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. त्याकडे सार्वजनिक बांधकाम व रस्ते विकास मंडळाने याकडे डोळेझाकपणा चालवले आहे.

हा मार्ग १९८९-९० च्या दरम्यान सुरु झाला. त्यावेळी या मार्गावर कांही ठिकाणी संरक्षण भिंती बांधण्यात आल्या होत्या काहीं ठिकाणी त्या कमकुवत झाल्या आहेत. ताम्हाणी घाटातील कमकुवत संरक्षक भिंतीमुळे अपघाताला सध्या निमंत्रण मिळत आहे. तर अनेक धोकादायक ठिकाणी संरक्षक कठडे नसल्यामुळे प्रवाशांना आपला प्रवास करताना असुरक्षित वाटत आहे. या मार्गांनी अनेक पर्यटक रायगड दर्शना सह कोकण दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात येतात मुळातच हा मार्ग अनेक ठिकाणी अरुंद आहे. तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूनी झाडे झुडपे मोठ्या प्रमाणात वाढली असून वळणावर समोरून येणारे वाहने दोन्ही वाहनाच्या चालकांना दिसत नाहीत.

या संरक्षित भिंतींची डागडुजी किवा दुरुस्ती झाली नाही. ती प्राधान्याने करावी असी मागणी प्रवासी वर्गातून होत असून ही धोकादायक वळणे प्रवाशी व वाहनचालकाची डोकेदुखीच ठरत आहे. रायगड हद्दीतील ताम्हाणी घाटातील कोंडेथर गावाजवळ सुमारे ८ कि. मी अंतराचा घाट असून या घाटात गेल्या वर्षभरात २० उपघात होऊन ६ प्रवाशांना आपला जीव गमवावा लागला आहे. तर ३५ प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. रायगड जिल्ह्यातील प्रख्यात छत्रपती शिवाजी महाराजांचा ऐतिहासिक रायगड किल्ला, महाड येथील चवदार तळे, हरीहरेश्वर, श्रीवर्धन, दिवेआगर, दिघी पोर्ट, मुरुड जंजिरा किल्ला, काशीद बीच, समुद्र लगतची किनारपट्टी येथे पर्यटक मोठ्या संख्येने पर्यटनासाठी आवर्जून येतात.

मात्र रायगड जिल्ह्यातील घाट हद्दीतील अवघड जीवघेणी वळणे, तसेच या मार्गाचे रुंदीकरण करून रस्ता करणे गरजेचे आहे. तसेच संरक्षक भिंती व या घाटात दरडी कोसळू नये म्हणून उपाययोजना आखण्याची गरज आहे.

विद्यार्थ्यांकडून विसापूर किल्ल्याची स्वच्छता

। खोपोली । प्रतिनिधी ।

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापनकेलेल्याहिंदवीराज्याचेस्मरण लहान मुलांना लहानपणापासूनच व्हावे यासाठी शिवप्रेमी वेगवेगळे उपक्रम राबविला.

लहान मुलांना छत्रपती शिवाजी महाराजानंचा इतिहास व पराक्रम समजावून सांगत असताना खालापूर तालुक्यातील ग्रामीण चिंचवली गोहे गावामधीलशाळेयवमहाविद्यालयीन विद्यार्थ्यांना राजांच्या पराक्रमाची व गडकिल्ल्यांची माहिती लवकरात लवकर आत्मसात व्हावी, यासाठी या गावात स्वराज्य प्रतिष्ठानच्या माध्यमातून १ ली ते १५ वीपर्यंतच्या जवळपास ७० हून अधिक

विद्यार्थ्यांना गडकिल्ल्यांवर नेऊन राजांच्या शौर्याची माहिती सांगण्यात येत आहे.

आतापर्यंत पाच किल्ल्यांवर येथील विद्यार्थ्यांनी माहिती आत्मसात केली असून, विद्यार्थ्यांनी फक्त माहिती आत्मसात करण्यावर न गडकिल्ल्यांवर जाऊन स्वच्छता मोहीम राबविली. विसापूर किल्ला सर करीत किल्ल्याचा परिसर स्वच्छ केल्याने त्याच्या या मोहिमेचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

झिराड येथे माघी गणेशोत्सव साजरा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

तपस्वी रामजी लक्ष्मण घरत समाज मंदिर, झिराड येथे माघी गणेशोत्सव साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष सुबोध राऊत यांच्या हस्ते श्रींची विधिवत पूजा व अभिषेक करण्यात आला. नंतर बाप्पांची आरती करून प्रसाद वाटण्यात आला. उत्सवासाठी अध्यक्ष सुबोध राऊत, उपाध्यक्ष श्रीकांत ठाकूर, सचिव मोहन पाटील, सदस्य अरूण राऊत, सुहास ठाकूर, यश ठाकूर, संतोष ठाकूर, प्रगती ठाकूर, रंजन पुरव, जयवंत नाईक, सुशिला अँग्रोचे उमेश म्हात्रे, प्राची म्हात्रे व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

सेझच्या जमिनी परत मिळण्याकरिता जिल्हाधिकाऱ्यांकडे सुनावणी सुरू

। उरण । वार्ताहर ।

सन २००५-०६ मध्ये महाराष्ट्र शासनातर्फे महामुंबई सेझ कंपनीने उरण, पनवेल, पेण तालुक्यामधील जमीन मिळकती सेझ प्रकल्पा करिता खरेदी करून परस्पर स्वतः च्या नावावर करून घेतल्या. सदरचे सेझ स्थापन्या अगोदर विकास आयुक्त (उद्योग) यांनी दिनांक १६/०६/२००५ रोजीचे आदेशानुसार सेझ कंपनीने खरेदी केलेल्या जमीन मिळकती १५ वर्षामध्ये न वापरल्यास अथवा त्यावरती प्रकल्प उभा न केल्यास संबंधित शेतकऱ्यांनी मागणी केल्यास सदरच्या जमीन मिळकती संबंधित शेतकऱ्यांना मूळ किंमतीला परत कराव्या लागतील.

महामुंबई सेझ कंपनीने जमिन मिळकती ताब्यात घेऊन जवळजवळ १७ वर्षे पूर्ण झाले आहेत. त्यामुळे उरण, पनवेल व पेण तालुक्यामधील संबंधित शेतकऱ्यांनी मुंबई कुळ वहिवाट व शेतजमिन अधिनियम ६३ (१) अ अनुसार जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांजकडे चौकशी अर्ज दाखल केला आहे. त्याची प्रथम सुनावणी २३ फेब्रुवारी रोजी सुरू झाली आहे. अशाप्रकारे लवकरच सेझग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. याकरीता ॲड. दत्तात्रेय नवाळे यांनी गेले पाच वर्षापासून पाठपुरावा चालविला होता. तसेच याकरीता प्रकल्पग्रस्त शेतकरी सामाजिक विकास संस्था पेण या संघटनेचे अरूण पाटील, ॲड. वृषाली पाटील यांनी त्यांना साथ दिली.

शेती व्यवसायातून धरली प्रगतीची कास

संतोष पेरणे

। नेरळ ।

कर्जत तालुक्यातील प्रगतशील शेतकरी आपली ओळख निर्माण करणाऱ्या विनय वेखंडे यांनी यावेळी कृषी पर्यटनाबरोबर आता भाजीपाला शेती व्यवसायाकडे आपली पावले वळवली आहेत. दरम्यान, ताजा आणि दररोज उपलब्ध होत असल्याने कर्जत शहरातील घाऊक भाजीपाला विक्रेते यांच्याकडून दररोज भाजीची उचल केली जात आहे. त्यामुळे विनय वेखंडे यांचा हा नवीन व्यवसाय चांगला आर्थिक नफा मिळवून देत आहे.

विनय वेखंडे यांनी वदप गावातील राजनाला कालवा परिसरातील शेतीमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे भाताचे उत्पादन घेणारी

॥ शेतकऱ्याने फुलविला भाजीचा मळा

॥ ताजी भाजीसाठी व्यापाऱ्यांकडून मागणी

शेती करीत आहेत. त्यांनी एक हेक्टरमध्ये भाताचे विक्रमी पीक घेतल्याबद्दल त्यांना राज्य पातळीवर पुरस्कार यापूर्वी मिळाला आहे. पाच एकर क्षेत्रात कांदा, फराजबी, भेंडी, टोमॅटो, काकडी, मिरची, कोबी आणि कलिंगडाचे उत्पादन घेण्यासाठी शेती केली आहे. या सर्व भाजीपाला शेतीतून मागील दहा दिवसांपासून उत्पादन मिळू लागले आहे. वेखंडे हा सर्व भाजीपाला आपल्या गावापासून ४ किलोमीटर अंतरावर असलेल्या कर्जत शहरात विक्रीसाठी नेण्याचे निश्चित केले होते. मात्र, ताजा भाजीपाला मिळत असल्याने कर्जत शहरातील काही भाजीपाला विक्रेते यांच्याकडून दररोज मागणी असते . त्याचा परिणाम ताजी आणि गावठी भाजी विकत घेण्यासाठी सर्व व्यापारी यांच्याकडे ग्राहकांची गर्दी होत आहे.

अॅड:जी.जी.गोंधळी

जाहीर नोटीस

नि.७/ड

पनवेल येथील मे.प्रमुख जिल्हा न्यायाधीश सो यांचे कोर्टात

दिवाणी संकीर्ण अर्ज क्र.:२४/२०२१

उमेश शशिकांत पेडणेकर .....अर्जदार

वि.

स्वाती नंदकुमार साने .....सा.वाला

वगैरे २

या जाहीर नोटीसीने सर्वांस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी मे. कोर्टात पनवेल नगरपालिका हद्दीतील सिटी सर्व्हे प्रा.नं.२०५/१७ मिडल क्लास को.ऑप है.सोसायटीमधील प्लॉट नं.१३२, अंदाजे क्षेत्र ७८१ चौ. फुट कारपेट व १८० चो.फुट टेरेस या मिळकतीबाबत अर्जदार यांना कै.स्नेहलता गजानन कोवळे यांनी दि.६/१/२०२१ रोजी मृत्यूपत्र करून दिलेले आहे. तसेच कै. ललीता उमेश पेडणेकर यांनी दि१९/१०/२०११ रोजी मृत्यूपत्र करून दिले आहे. सदर दोन्ही मृत्यूपत्र बाबत अर्जदार यांनी मे.कोर्टात प्रोबेट व लेटर ऑफ मिनिस्ट्रेशन करिता अर्ज केलेला आहे.

सदर प्रकारणात सामनेवाला अगर इतर कोणीही संबंधीत व्यक्ती किंवा व्यक्तिने त्यांची कोणतीही व कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः /प्रतिनिधी/एजंट/वकिल मार्फत जी हरकत असेल ती लेखी स्वरूपात मे. कोर्टात नेमलेल्या तारखेत दि.०३/०२/२०२२ पर्यंत किंवा त्या तारखेस हजर राहून त्यांची लेखी हरकत मे.कोर्टात दाखल करावी.मुदतीत सदर प्रकरणी कोणीही कसलीही हरकत दाखल केली नाही किंवा उपस्थितही राहीला नाहीत तर मे.कोर्ट त्यांचे विरुद्ध एकतर्फी सुनावणीचा आदेश करतील याची नोंद घ्यावी.

पनवेल

ता.०३/०२/२०२२

कोर्टाचा शिक्का

सही/-
Asstt. Supdt.
[Admn]
District Court, Panvel-Raigad

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बागायत मिळकतीचे विद्यमान मालक प्रिया शैलेश वर्तक, सलोनी शैलेश नाईक, श्रीया शैलेश वर्तक सर्व रा.मु.पो. नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या नावे असलेली बागायत मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र. व उपविभाग क्र.	क्षेत्र हे.आर.	आकार रु.पैसे
नागांव	५८४/१	0-0४-४0	१.३0
ता.अलिबाग		पो.ख.0-0१-६0	
		एकूण 0-0६-00	

वर नमूद मिळकतीमध्ये असलेल्या वहिवाटीच्या हक्क अधिकारांसह

सबब सदरहू बागायत जमिनीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहेत असे गृहीत धरून माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांकः ०३/०२/२०२२

सही/-
ॲड.मनोज बाळकृष्ण पडते
पत्ताः गुंजीस, ता.अलिबाग, जि.रायगड

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे मापगाव ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची भातशेती जमिन व मिळकत, त्या मिळकतीच्या विद्यमान मालक श्रीमती शैला नंदलाल परळकर यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले असुन तसा साठेकरारदेखील स्वाक्षरीत झाला आहे. .

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट नं.	क्षेत्र (हे. आर.)	आकार (रु.पै.)
मापगाव	३३	0-५५-५0	१४.३४
		पो.ख. 0-0८-७0	
		0-६४-२0	

पैकी 0 हे. ३३.५0 आर एवढी मिळकत

सदरची भातशेती मिळकत ही त्यांचेनिर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलास दिलेला आहे. मात्र तरीदेखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज,लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसबंध असल्यास अथवा कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हकरती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकत ही विद्यमान मालकांची निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून, मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
ता.६/०२/२०२२

सही/-
ॲड.माधवी नारायण ठाकूर
सी/२०१, क्लिफ हेवन हा.सोसायटी
स्टेट बँक ऑफ इंडियाजवळ, कोर्ट रोड,
अलिबाग-रायगड ४०२ २०१

जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, खालील नमुद केलेली भातशेती मिळकत आम्ही कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरच्या मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालका सोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा आम्हास विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

मिळकतीचे वर्णन

मौजे, खानाव, ता.अलिबाग, जि.रायगड

मौजे	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र
खानाव	९	२	0-३६-२0
			एकूण पो.ख 0-0७-८0
			एकूण अ+ब 0-४४-00

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारा हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्यामुळे सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ०७ (सात) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारचे हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आम्ही सदरच्या मिळकतीच्या विक्री व्यवहार पूर्ण करू व मागाहून येणारी कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी. हे कळावे.

ठिकाणः अलिबाग
दिनांकः ०५/०२/२०२२

बिल्डमर्क इंटरप्रायझेस
मेघा टॉकीज समोर चेंढरे
मोबा. नं.९५५२८१८८४९

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल श्रीमती. रेखा रामकृष्ण पाटील रा.फ्लॅट नं.१, सुशिला अपार्टमेंट, कोतवालनगर, कलावती मंदिराजवळ ता.कर्जत जि.रायगड यांनी कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

मौजे नसरापूर ता.कर्जत, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

जमीन मालक	सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र	आकार	पोट खराबा
१) गोपाळ मुलजी पटेल २) मनहर मुलजी पटेल ३) संजय एन.शहा ४) विश्राम मुलजी पटेल	६९	४	१.३५.00	१.११	0.0६.00

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा-कबजा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी, हक्क, मृत्यूपत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

तारीखः ६/२/२०२२

ॲड.कल्याणी रवी गायकर
पत्ताः-प्रेमसिंधु अपार्टमेंट,
कोतवालनगर-कर्जत, जि.रायगड
मो.नं.८४४६१४८७८१

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

तुफानातील दिवे
दीपक शेडगे
९९६९४०८८३५

चित्रपट आणि दूरचित्रवाणी क्षेत्रात पदार्पण करणाऱ्यांसाठी मार्गदर्शक

सुप्रसिध्द अभिनेत्री अलका कुबल-आठल्ये या केवळ चित्रपटातील अभिनेत्रीच आहेत असे नव्हे. तर चित्रपट आणि दूरचित्रवाणी क्षेत्रात नव्याने पदार्पण करणाऱ्या युवा पिढीसाठी आज तुफानातील दिव्याप्रमाणे मार्गदर्शक आहेत. अभिनय क्षेत्रात नाव मिळविण्यासाठी तरुणी ज्यावेळी स्ट्रगलर म्हणून सुरुवातीला प्रवास करत असतात, तेव्हा त्यांच्या सुरुवातीच्या काळात योग्य मार्गदर्शन आणि त्यांची कुठेही फसवणूक होऊ नये, म्हणून कोणत्या प्रकारची काळजी घ्यायची असते, या विषयी सर्वांनाच विशेष मार्गदर्शनही सातत्याने करीत असतात. त्या स्वत: चित्रपट आणि मालिकांमधून अनेक भूमिका तर करतात पण त्याच बरोबर चित्रपट आणि टेलिव्हिजन मालिकांची निर्मिती देखील करतात आणि त्यातून नव्या कलावंताना काम करण्याची संधीदेखील उपलब्ध करुन देतात. त्यामुळे आज त्या अलकाताई म्हणून सर्वश्रुत असतात.

आजपर्यंत त्यांनी आई माझी काळुबाई (सोनी मराठी वाहिनीवर, २०२०), दर्शन (कलर्स मराठी वाहिनीवर, २०१६), मंगळसूत्र (फक्त मराठी वाहिनीवर, २०१३) यासारख्या मालिकामधून काम करण्यासाठी अनेक तरुण-तरुणींना संधी मिळवून दिली आहे. अलका कुबल यांचे पती समीर आठल्ये हे देखील चित्रपट क्षेत्रात उत्कृष्ठ कॅमेरामन असल्याने अलकाताई आणि समीर यांचे घर म्हणजे चित्रपट आणि टेलिव्हिजन सिरिल्स् निर्मितीची एक कार्यशाळा म्हणूनच ओळखले जाते. अभिनयाप्रमाणेच निर्मिती क्षेत्रातील धडे तरुण-तरुणींना प्रत्यक्ष काम करण्याची संधी देऊन त्यांच्याकडे दिले जातात. सध्या सोनी मराठी वाहिनीवर गाजत असलेली आई माझी काळुबाई ही त्यांची मालिका तर नव्यानेच या क्षेत्रात पदार्पण करणाऱ्या कित्येक तरुण-तरुणींना हक्काचे व्यासपीठ बनली आहे.

'अलका कुबल' यांची चित्रपट क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी

अलका कुबल (सासरच्या अलका आठल्ये) या मराठी-हिंदी चित्रपटांतून काम करणाऱ्या एक प्रसिद्ध मराठी अभिनेत्री आहेत. एक बालकलाकार म्हणून त्यांनी लहानपणापासूनच व्यावसायिक नाटकांतून काम करायला सुरुवात केली. इयत्ता १० वी मध्ये असताना त्यांनी चक्र या चित्रपटात छोटी भूमिका केली होती. नटसम्राट, संध्याछाया, वेडा वृंदावन अशा काही नाटकांमध्ये त्यांनी लक्षवेधी भूमिका साकारल्या. स्त्रीधन या चित्रपटाद्वारे त्यांनी चित्रपट सृष्टीत व्यावसायिक अभिनेत्री म्हणून प्रवेश केला. माहेरची साडी या प्रसिद्ध चित्रपटाच्या यशामुळे त्या प्रसिद्धीच्या झोतात आल्या. त्यासोबतच लेक चालली सासरला, तुझ्यावाचून करमेना, माहेरचा आहेर, दुर्गा आली घरा, काळूबाईच्या नावानं चांगभलं, सुवासिनीची सत्त्वपरीक्षा, अग्निपरीक्षा असे त्यांचे अनेक चित्रपट लोकप्रिय झाले. यांपैकी काही चित्रपटांची निर्मिती देखील त्यांनी केली. अमृतवेल, युगंधरा, बंदिनी, येरे येरे पैसा, आकाशझेप, माझी आई काळुबाई अशा दूरचित्रवाणी मालिकांमध्ये त्यांनी प्रमुख भूमिका केल्या. अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे, दादा कोंडके, सचिन पिळगांवकर अशा मराठीतील आघाडीच्या नायकांबरोबर त्यांनी भूमिका केल्या. हिंदीमधल्या शिर्डीचे साईबाबा या चित्रपटातील भूमिका उल्लेखनीय आहे.

त्यांनी आता पर्यंत दुर्गा आली घरा, धरलं तर चालतंय, धुरळा, नातीगोती, नाशकलंक, निर्मला मच्छिंद्र कांबळे, पहिलं पाऊल, पोरीची धमाल बापाची कमाल, बंडलबाज, बाळाचे बाप ब्रह्मचारी, बाळुमामाच्या नावानं चांगभलं, भक्ती हीच खरी शक्ती, भाऊबीज, मंगळसूत्र, मधुचंद्राची रात्र, मराठा बटालियन, श्री महालक्ष्मी व्रतकथा, माझं घर तुझा संसार, माझी शाळा, माय माऊली मनुदेवी, माया ममता, माहेरचा आहेर, माहेरची पाहुणी, राजाने वाजवला बाजा, लगीन माझ्या खंडोबाचं, लेक चालली सासरला, वधू माऊली, वहिनीची माय, वाट पाहते पुनवेची, विघ्नहर्ता, वेडिंगचा शिनेमा, शुभ बोल नाऱ्या, श्रीमंत दामोदरपंत, सूर राहू दे, ही वाट जीवनाची, डॉ. तात्याराव लहाने, दे टाळी इत्यादी ७२ पेक्षा जास्त मराठी चित्रपटातून वैविध्यपूर्ण भूमिका साकारल्या आहेत. तसेच आदमी और औरत, चक्र, नया जहर, फिर वही आवाज, महात्मा बसवेश्वर, बाबा, शिरडी साई बाबा या ७ हिंदी चित्रपटात देखील विविध भूमिका साकारल्या आहेत. ज्या सर्व रसिक प्रेक्षकांना भावल्या आहेत. त्यांनी गाढवाचं लग्न, नटसम्राट, वटसावित्री, वेडा वृंदावन, श्रीमंत दामोदरपंत, संध्या छाया या गाजलेल्या मराठी नाटकातून देखील महत्वाच्या भूमिका केलेल्या आहेत.

विविध पुरस्कारांनी सन्मानित

चित्रपट क्षेत्रात उल्लेखनीय काम केल्याबद्दल त्यांचा वेळोवेळी अनेक पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला आहे. त्यांना राज्य सांस्कृतिक

पुरस्कार-२०१३ व व्ही. शांताराम पुरस्कार-२०१६ देत महाराष्ट्र शासनानेही गौरविलेले आहे. तसेच त्या कलासाधना :कला जीवन गौरव गंगा-जमुना पुरस्कार या पुरस्काराच्या त्या मानकरी आहेत.

फुलराणी ॲडव्हरटायझिंगतर्फे महाराष्ट्र शासनासाठी पाण्याचे महत्त्व सांगणाऱ्या जाहिरातीची निर्मिती करताना मला अलका कुबल यांच्या सोबत काम करण्याचा योग आला आणि त्यांच्या मोकळ्या व प्रेमळ स्वभावाची काही वर्षापूर्वी ओळख झाली. ओळखीचे रुपांतर मैत्रीत कधी झाले हे कळलेच नाही. पुढील काळात दूरदर्शनसाठी 'एक दिवस सेलिब्रेटीसोबत' या कार्यक्रमानिमित्ताने त्यांच्या घरी जाऊन चित्रीकरण करण्याचा योग आला तेव्हा त्यांच्यातील उत्कृष्ठ गृहिणीची ओळख झाली. त्यांनी स्वत: तयार केलेले मालवणी पद्धतीचे जेवण स्वत:च्या हाताने आम्हाला वाढले. गृहकर्तव्यदक्षातील ते आदरातिथ्य आणि अन्नपूर्णा अशा अलकाताईंनी बनविलेल्या त्या जेवणाची रुची विसरता येत नाही.

अलका कुबल व निर्माता दीपक शेडगे टेलिव्हिजन जाहिरातीच्या सेटवर

त्यांच्या अभियनक्षेत्रातील कारकिर्दीची सुरुवात कशी झाली, याविषयी जाणून घेताना त्या म्हणाल्या की, माझे आजोबा भाऊराव मुंबईकर एकदा मला सहजच भाऊ पाध्येंकडे घेऊन गेले. तेव्हा मी आठ वर्षाची होती. मला तिथे गेल्यानंतर त्यांनी सहजच प्रश्न केला तुला नाच येतो का? मी हो म्हटलं व नाचून दाखवलं, गाते का विचारल्यावर गाणं गुणगुणलं. त्यांनी माझ्यातील कलागुण ओळखून मला 'नटसम्राट' नाटकातील ठमीची भूमिका दिली आणि एक बालकलाकाराच्या रुपात माझा कलाक्षेत्रातील प्रवास सुरु झाला. या नटसम्राट नाटकाच्या एकूण २५० प्रयोगात मी ठमी साकारली. त्यानंतर पुढील तीन वर्षांनी 'संध्याछाया', 'माधव वाटवे' 'वेडा वृंदावन' या नाटकात मी भूमिका साकारली. यातील अधोरेखित करण्यासारखी बाब म्हणजे त्यावेळचे दिग्गज अभिनेते नयनतारा, यशवंत दत्त यांच्या समवेत एकंदर तील नाटके केली.

तर आपल्या शिक्षणाविषयी बोलताना त्या पुढे म्हणाल्या, 'मी मराठी माध्यमातून शाळा शिकले. नंतर दालमीया कॉलेजमध्ये जायची. मी कॉलेजमध्ये असतांना स्पर्धात्मक नाटकातून, एकांकिकेतून काम केले. विविध वक्तृत्व स्पर्धेत सहभागी होत अनेक बक्षिसे मिळविली. 'लेक चालली सासरला' हा भावनाप्रधान चित्रपट मी त्यावेळी केला. शिक्षण सुरु असताना मला शुटींग करताना व्यत्यय येत असे. मात्र, मी बी. ए. सायकॉलोजी या प्रमुख विषयात महाविद्यालयीन शिक्षण घेतले. चित्रपटाचे शुटींग आटोपल्यावर मी अभ्यास करत असे. एकीकडे चित्रपटांचे शुटींग व दुसरीकडे माझा अभ्यास असे असताना मी बी.ए. पास केले. माहेरी आई वडीलांचे (सपोर्ट) सहकार्य कसे मिळाले? या माझ्या प्रश्नाचे उत्तर देताना त्या हसतच म्हणाल्या 'सुरवातीला वडीलांचा विरोध होता. तसं आमचं मध्यमवर्गीय मराठमोळं कुटुंब. दोन भाऊ शरद व वसंत व आम्ही दोघी शिल्पा व मी. वडील टाटा मिलमध्ये सुपरवायझर होते. आई बीएमसीमध्ये शिक्षिका होती. माझे वडील मी १६ वर्षाची असताना ब्रेनहॅमरेजमुळे वारले. आम्ही सगळे आईच्याच संस्कारात वाढलो, घरातही मदत होईल व मला कलेची आवड असल्यामुळे कला क्षेत्रातच करियर करायचे ठरवले. मोठी बहीण माझी हेअर ड्रेसर व स्टाईलर म्हणून माझे काम बघते. एक भाऊ बीएमसीमध्ये आहे, दुसरा भाऊ एडिटींगचा सेट बघतो व स्टुडीओ आहे.

स्वच्छंद व मनमिळावू स्वभाव, हसरा चेहरा, गौरवर्ण कांती अशा अलका कुबल-आठल्ये माझ्याशी मुलाखतीत रमल्या होत्या. अगदी डाऊन टु अर्थ, असे त्यांचे वागणे होते.

आपल्या प्रापंचिक जीवनाविषयी बोलताना म्हणतात की, तसं माझं लव्हमॅरेज झालं. समीर आठल्ये हा कॅमेरामन, मी शुटींग करताना बहुदा तो सेटवर असायचा. मग आमची मैत्री झाली म्हणजे ठरवून वगैरे नाही. पुढे त्याचे रुपांतर लग्नात झालं. सुरुवातीला आईचा विरोध होता कारण दोघेही एकाच क्षेत्रात असल्यामुळे पुढे कसं होणार? एक तरी सरकारी नोकरी करणारं हवं, अशी आईची इच्छा होती. २५ व्या वर्षी माझं लग्न झालं. मी 'अलका कुबल'ची 'अलका समीर आठल्ये' झाले. आम्ही ठाण्याला राहायला होतो. एम.एच.हायस्कूल मध्ये सासुबाई होत्या, त्या रिटायर्ड झाल्या. माझ्या सगळ्या शुटींग वेस्टर्नला असल्यामुळे आम्ही गोरेगावला शिफ्ट झालो.

या क्षेत्रातील आपले गुरु कोण? या माझ्या प्रश्नाचे उत्तर देताना त्या म्हणाल्या की, मी कुणाकडेही नाटकाचे धडे घेतले नाही किंवा कुणालाही गुरु मानले नाही. पण प्रत्येक दिग्दर्शकास मी गुरु मानते व त्या भूमिकेतून काम केले. मी अनुभवातून शिकत गेले. त्याबाबतीत मला जास्तीत जास्त अशोक सराफ यांची मदत झाली. वेगवेगळ्या दिग्दर्शकांकडून मला शिकायला मिळालं. माझं लक फॅक्टर जोरात होतं. 'लेक चालली सासरला', 'तुझ्या वाचून करमेना', 'स्त्री धन' या चित्रपटांनी महाराष्ट्र शासनाचे सर्वात उत्कृष्ठ नायिकेचा पुरस्कार मिळाला. सुरुवातीला मी तीन चित्रपट केले. गेली २४ वर्ष मी चित्रपटात काम करते. आता पर्यंत मी २२५ चित्रपटामध्ये काम केलं. 'युगंधरा', 'अमृतवेल', 'देवकी', 'नवसाचं पोर' 'तुझ्यावाचुन करमेना', 'माहेरची साडी' इत्यादी. 'माहेरची साडी' या चित्रपटाने मला घराघरात पोहचवलं. या चित्रपटाने मला नाव दिलं, ग्लॅमर मिळालं. मी एका स्टेजला पोहचले. पैसा, स्टेटस सर्व मिळालं. एका उंच शिखरावर पोहचले. एका मध्यमवर्गीय व्यक्तीला जगायला काय हवं असतं? गाडी, बंगला, ऐश्वर्य (पैसा) हे सर्वच मला 'माहेरची साडी' या चित्रपटाने दिलं. लग्नानंतर दहा वर्ष मी फार व्यग्र होते. माझ्या दोन्ही मुली सेटवरच वाढल्या. प्रत्येकाची एक इमेज असते. लोकांनी मला त्या भूमिकेमध्ये स्विकारलं. लक्ष्मीकांत बेर्डे, अशोक सराफ, सुभाष जाधव यांचा चित्रपट केला. 'नातीगोती', 'रिक्षावाली', 'नवसाचं पोर' इत्यादी अन्याय सहन न करणाऱ्या स्त्रीची भूमिका करायला मला आवडते. जशा भूमिका मिळाल्या तशा एक अभिनेत्री म्हणून स्वीकारत गेले. २२५ चित्रपटांपैकी १०० चित्रपट वेगळ्या भूमिकेत केले आहेत.

'माहेरी आई व इकडे मिस्टर!'

तर मिस्टरांचे सहकार्य कितपत लाभले आणि सासूबाईंचे?, या माझ्या प्रश्नाचे हसत हसतच उत्तर देताना त्या म्हणाल्या की, मिस्टर कॅमेरामन असल्यामुळे त्यांना माहीत आहे, शिफ्ट असतात. कधी २ वाजतात तर कधी ३, पण ते मला समजून घेतात. त्यांना गर्व अजिबात नाही. त्यामुळे आमच्यात तसे मतभेद झाले नाहीत. ते फार ॲक्जस्टेबल आहेत. घरी सासूबाई असल्यामुळे तशी फारशी काळजी नसते. त्याही मला सांभाळून घेतात. मला सामाजिक क्षेत्राची आवड आहे. महिलांच्या कार्यक्रमांमध्ये मी आवर्जून जाते. नवरात्रीमध्ये मी कार्यक्रमांना सेलिब्रेटी म्हणून जाते. समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत जाण्यात आणि त्यांचे जीवनमान समजून घेण्यात मला पहिल्यापासूनच स्वारस्य आहे. त्यामुळे मी आजच्या तरुण पिढीतील 'युवा वर्गासाठी या क्षेत्रातील संधी'विषयी मार्गदर्शन करण्यासाठी व त्यांना या क्षेत्रात नवीन संधी उपलब्ध करुन देण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असते. अशाप्रकारे ताईंसोबत गप्पा रंगत होत्या. सहज संवादाने सुरु झालेली मुलाखत सहज-तेने पुढे जात होती. यासाठी किती काळ खर्ची झाला, याचा अदमास जरी तेव्हा आला नसला तरी मुलाखत आटोपल्यावर त्याचे गणित लागले. अर्थातच व्यक्तीही तशीच होती. त्यामुळे मुलाखतीच्या निमित्ताने सुरु झालेल्या संवादात गप्पा रंगत होत्या. अलका कुबल या दिग्गज अभिनेत्रीसोबत गप्पा मारताना मी त्यांची मुलाखत घेतोय आणि माझ्या विचारलेल्या प्रश्नांना अलकाजी त्रोटक व जेवढ्यास तेवढंच उत्तर देताहेत, असे मुलाखत संपेपर्यंत कुठेच जाणवलं नाही. मराठी रसिकप्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारी ही अभिनेत्री त्यांच्या स्मरणीय भूमिकेतील सुस्वभावी, घरदांज, मनमिळाऊ, गृहकर्तव्यदक्ष अशीच प्रत्यक्ष जीवनातही आहे, याचा प्रत्यय या मुलाखती दरम्यान आला.

deepakshedge007@gmail.com

साप्ताहिक राशिभविष्य : दि. ६ फेब्रुवारी ते १२ फेब्रुवारी २०२२

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

संथगतीने दिलासा मिळेल

मेष : मेषराशीधारकांना या साप्तहाच्या पूर्वार्धात चिंतन करून स्वतःच्या काही दोषांचे निराकरण करू शकाल. थोड्या प्रतिकूलतेस सामोरे गेल्यानंतर आपणास हळूहळू दिलासा मिळू लागेल. उत्तरार्धात गृह सजावटीचे कार्य हाती घ्याल. अतिरिक्त कामामुळे शरीरास थोडा थकवा जाणवला तरी त्यामुळे आर्थिक लाभ होण्याची शक्यता असल्याने आपण काही तक्रार करणार नाही. व्यावसायिक आघाडीवर आपल्या कष्टाचे फळ मिळू लागेल. सुरुवातीस आपली कामे नियोजनानुसार पूर्णत्वास नेण्यासाठी परिश्रम करावे लागले किंवा आपले फासे उलटे पडले तरी निराश न होता प्रयत्न चालू ठेवावेत. कारण उत्तरार्धात यश प्राप्ती होऊन आपणास मानसिक दिलासा मिळेल. पूर्वार्धात नोकरीत वरिष्ठांशी काही कारणाने वाद होणार नाहीत याची काळजी घ्यावी. कायद्याविरुद्ध किंवा अनैतिक वर्तन वा कृती करून आर्थिक प्राप्ती करण्याचे विचार येत असल्यास ते वेळीच मनातून काढून टाका. **महिलावर्ग :** आपल्या प्रियव्यक्तीसाठी एखादी सुंदर वस्तू खरेदी करण्यासाठी आपण खर्च कराल. प्रियव्यक्ती, मित्र, नातेवाईक यांच्या सहवासात बहुतांश वेळ घालवाल. **शुभ दिनांक :** ७, ११.

यशापयशाचा संमिश्र काळ

वृषभ : वृषभराशीसाठी या सप्ताहात व्यावसायिक आघाडीसाठी पूर्वार्ध अधिक अनुकूल आहे. व्यावसायिक आघाडीवर प्रतिस्पर्धी व शत्रूंवर आपण मात करू शकाल. आपल्या कौशल्याच्या जोरावर आपण लोकांच्या प्रशंसेस पात्र व्हाल. नोकरी करणाऱ्यांच्या कामात व विचारात सर्जनात्मकता दिसून आल्याने पदोन्नतीची शक्यता नाकारता येत नाही. उत्तरार्धात शासकीय अडथळे येऊ शकतात. उत्तरार्धात आपली प्रतिमा मलीन होईल, अशा कार्यांपासून दूर राहवे. पूर्वार्धात पिता किंवा वडिलधाऱ्या व्यक्तींकडून लाभ होईल. परंतु उत्तरार्धात पैतृक संपत्तीशी संबंधित कार्यात विघ्ने येण्याची किंवा अपेक्षेनुसार फलप्राप्ती न होण्याची शक्यता आहे. मित्र, पत्नी, संतती यांच्याकडून लाभ होईल. स्त्री मित्रांकडून लाभ होईल. विद्यार्थ्यांना अभ्यासातील समस्यांचे निराकरण झाल्याने दिलासा मिळेल. कोणत्याही विषयाचा खोलवर अभ्यास करताना आपली आकलनशक्ती कमी असल्याचे जाणवेल. **महिलावर्ग :** दाम्पत्य जीवनात सुद्धा पारस्परिक विचारातील प्रगल्भतेमुळे एकमेकांच्या सहवासाचा अत्युच्च आनंद उपभोगू शकाल. आपल्या दोघात एकमेकांप्रतीचे आकर्षण टिकून राहील. **शुभ दिनांक :** ८, १०.

व्यवसायामध्ये प्रगतीची शक्यता

मिथुन : मिथुनराशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान असे की, आपली सुरुवात चांगली होईल. व्यावसायिक आघाडीवर प्रगतीची अपेक्षा आपण बाळगू शकता. आपली बहुतांश कार्ये ही कारकिर्दीच्या प्रगतीशी संबंधितच असतील. आपण भविष्यविषयक अनेक योजना सुद्धा तयार कराल. आपण स्वतःच्या कार्यात स्थैर्य राखण्याचा प्रयत्न कराल. जर कोणाशी व्यावसायिक संबंधात तणाव असेल किंवा कामात काही कायदेशीर किंवा इतर शासकीय समस्या असतील तर त्या दूर करण्यास आपण प्राधान्य द्याल. सुरुवातीस देशांतर्गत कार्ये व संपर्कात वाढ होईल. या कालावधीत आपण व्यक्तिगत व व्यावसायिक आघाडीवर सामाजिक माध्यमांचा उपयोग अधिक प्रमाणात कराल. आपण आपल्या व्यक्तिगत व व्यवसायिक संबंधात उत्तम प्रगती साधू शकाल. मित्रांचा संपर्क व सहवास कमी लाभला तरी वैवाहिक जोडीदार किंवा प्रिय व्यक्तीशी जवळीक राहील. यादरम्यान आपल्या वाणीची कलात्मकता वाढेल. **महिलावर्ग :** अनेकदा आपल्या वाक्चातुर्याने भिन्नलिंगी व्यक्ती आकर्षीत होतील. ह्या दरम्यान वैयक्तिक संबंधाचा उपयोग योग्य प्रकारे कसा करावा, हे आपणास समजू शकेल. **शुभ दिनांक** : ९, १२.

हळूहळू अनुकूलता लाभेल

कर्क : कर्क राशीधारकाची या सप्ताहाची सुरुवात सामान्यच असली तरी जसजसे दिवस पुढे सरकतील तसतसे वातावरण अनुकूल होत जाईल. सुरुवातीच्या दिवसात व्यावसायिक व व्यक्तिगत संबंधांच्या बाबतीत आपण अधिक उत्साह दाखवाल. आपल्यात कितीही उत्साह असला तरी तो इतरांसाठी त्रासदायी ठरणार नाही, याची आपणांस काळजी घ्यावी लागेल. आपण जर जीवनातील काही तथ्य समजून घेऊन ते अंमलात आणलेत तर हे दिवस आनंदात घालवू शकाल. सुरुवातीपासूनच भागीदारीत संबंधांचे उत्तम सौख्य मिळाल्याने आपले विचार सकारात्मक होऊन त्याचा परिणाम आपल्या व्यक्तिगत व व्यावसायिक जीवनावर होत असल्याचे दिसून येईल. जीवनात चढ-उतार तर येतच राहतील परंतु त्यांना सामोरे जाऊन आनंदाचे क्षण कसे घालवावे, हे जर आपण शिकून घेतलेत तर त्याहून कोणतेही यश मोठे असणार नाही. आपल्या मनात हा सिद्धांत केंद्रस्थानी असेल. **महिलावर्ग :** महत्वाचे निर्णय घेताना सुद्धा वैवाहिक जोडीदाराचे म्हणणे शांतपणे ऐकून त्यांच्या मुद्द्यांना महत्व द्यावे. **शुभ दिनांक :** ६,११.

नित्यनूतन वाटचाल करावी

सिंह : सिंहराशीचे या सप्ताहातील ग्रहमान पाहता, आपण आर्थिक, कारकीर्द, संबंध इत्यादी बाबतीत चुकीच्या भ्रमात, अनावश्यक विचारात गुंतून राहिले आहात. यामुळे वास्तविक स्थिती आपणास समजू शकत नसल्याने हा काळ आपणासाठी आशादाई ठरू शकणार नाही. त्यामुळे शक्य तितकी जास्त पारदर्शकता व स्पष्टता असावी. काहीवेळा हाती आलेली संधी निसटून गेल्याने स्वतःला किंवा नशिबास दोष देण्याऐवजी नव्या जोमाने, नव्या आशेने व नवीन व्यूहरचना करून मार्गक्रमण करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. असे करण्यात आपणास काही त्रास होईल, परंतु त्याने आपल्या जीवनात दीर्घकाळ टिकणारे सकारात्मक परिवर्तन घडून येईल, ज्यामुळे प्रतिकूल परिस्थितीचा सामना करण्याचे बळ आपल्यात येईल. हे वर्ष व्यावसायिक आघाडीवर भागीदारी कार्यासाठी आशास्पद नाही. सांघिक कार्यात व आपल्या वैयक्तिक कार्यात विलंब होईल. **महिलावर्ग :** उत्तरार्धात आपल्या कामांना गती येईल. सारासार विचार करूनच नवीन कार्याची सुरुवात करावी. आपल्या भावनांना आवर घालून जबाबदारपणे वागण्याचा प्रयत्न कराव. **शुभदिनांक :** ९,१०.

कामात सकारात्मक असावे

कन्या : कन्याराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान हे संघर्षांसह सुखद अनुभव देणारे आहे. जीवनाप्रति सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आपण मार्गक्रमण कराल. नोकरी करणाऱ्यांच्या कामात किंवा जागेत बदल होण्याची शक्यता असून, त्याचा कालांतराने आपणांस फायदा होईल. जर आपल्यावर कामाचे ओझे असेल किंवा प्रकल्प पूर्ण करण्यात विलंब होत असेल तर उत्तरार्धापासून त्यात सुधारणा होऊ लागेल. आठवड्याच्या मध्यापासून नोकरीत आपला उत्साह वाढल्याने सहकाऱ्यांशी काही कटूता निर्माण होणार नाही, याची काळजी घ्यावी लागेल. आजवर व्यावसायिक आघाडीवर होत असलेला विलंब ओसरताना, कामाचे ओझे कमी होण्याचा प्रत्यय येऊ शकेल. भागीदारी कार्यात किंवा नवीन करारात आगामी काळात विलंबाची शक्यता असल्याने त्यापूर्वीच त्यांची पूर्तता करावी. **महिलावर्ग :** मात्र सतत आपल्या भावनात चढ-उतार होत असल्याचे दिसून आल्याने अधूनमधून आप्तांपासून दूर जाल. मात्र, अशा परिस्थितीत जर आपल्याऐवजी त्यांच्या दृष्टिकोनातून परिस्थितीचा अभ्यास केलात तर त्याचे उत्तम परिणाम मिळवू शकाल. **शुभदिनांक :** ७,८.

रागावर नियंत्रण राखावे

तूळ : तुलराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता शक्य तितका स्वभावातील उग्रपणा नियंत्रित ठेवलात, तर संबंधात दुरावा निर्माण होणार नाही. प्रिय व्यक्तीच्या सहवासाचा आनंद उपभोगू शकाल. एखाद्या रमणीय स्थळी फिरावयास किंवा छोट्या प्रवासास जाऊन आनंदात वेळ घालवू शकाल. पूर्वार्धात विद्यार्थ्यांना परिश्रम वाढवावे लागले तरी उत्तरार्धात त्याचे चांगले फळ मिळू शकेल. बौद्धिक प्रवृत्ती व चर्चेस आपण प्राधान्य द्याल. पूर्वार्धात आपणास आरोग्याची काळजी घ्यावी लागेल. वाहन चालवताना काळजी घेण्याचा सल्ला देण्यात येत आहे. अनावश्यक खर्च टाळावा. आर्थिक बाबतीत तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच व्यवहार करावेत. जेणेकरून ज्याचा योग्य परतावा आपणास मिळू शकेल. आरोग्याच्या दृष्टीने पूर्वार्ध चांगला असला तरी उत्तरार्धात विशेषतः रक्तदाब, हृदयाच्या ठोक्यांची अनियमितता किंवा डोळ्यांची जळजळ इत्यादी समस्या होण्याची शक्यता आहे. **महिलावर्ग :** कोणाशीची नाराजी पत्करू नका. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. घरगुती वातावरण चांगले ठेवण्याचा प्रयत्न करा. **शुभदिनांक :** ८,११.

आर्थिकबाबत काळजी घ्या

वृश्चिक :- वृश्चिकराशीसाठी या सप्ताहात आपल्या प्राप्तीत थोडी अनिश्चितता निर्माण होण्याची शक्यता असल्याने उत्तरार्धात आपणास आर्थिकबाबीत काळजी घ्यावी लागेल. विशेषतः कोठून पैसे येणार असतील तर वसुलीवर आधीपासूनच लक्ष देण्याचा सल्ला देण्यात येत आहे. गुंतवणुकीसाठी शेवटचे तीन दिवस उत्तम आहेत. पुढील काळावधीत आपल्याला शासकीय लाभ किंवा वरिष्ठांकडून लाभ किंवा पैतृक संपत्तीतून प्राप्ती संभवते. जर भावंडांशी पैतृक संपत्तीमुळे तणाव निर्माण झाला असेल तर वडिलधाऱ्यांच्या मध्यस्थीने त्याचे सुखद निराकरण होऊ शकेल. आरोग्याच्या दृष्टिकोनातून दिवस चांगले असले तरी अखेरच्या तीन दिवसात नाक-कान-घसा यांच्याशी संबंधित त्रास होण्याची शक्यता आहे. दरम्यान विशेषतः श्वसनाचे विकार, कफ, खोकला यांचा त्रास वरचेवर होण्याची शक्यता असल्याने आरोग्याची काळजी घ्यावी लागेल. बौद्धिकक्षेत्राला वाव मिळेल. **महिलावर्ग :** विशेषतः महिलावर्गाला त्यांच्या अंगभूत कलागुणांना उत्तम संधी मिळेल. प्रवास योग संभवतात. प्रकृतीबाबत जागरूक रहावे. **शुभदिनांक :** ९,१२.

आर्थिकसोबत आरोग्यही जपावे

धनु : धनुराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता, यादरम्यान प्रिय व्यक्ती किंवा वैवाहिक जोडीदाराशी व्यवहारातसुद्धा बदल होऊ शकतो. आपल्या भिन्नलिंगी व्यवसायिक संबंधातील जवळीक वाढेल. दरम्यान वस्त्रालंकार, हौसमौज करण्याच्या वस्तू इत्यादीसाठी खर्चाची किंवा खरेदीची शक्यता आहे. आपल्याजवळ आर्थिक सुबत्ता असली तरी खर्चावर नियंत्रण ठेवल्यास उर्वरित रक्कम गुंतवणूक करून किंवा अन्य मार्गाने खर्च करून आपल्या फायद्यात वाढ करू शकाल. आपल्या प्राप्तीच्या साधनात बदल होण्याची शक्यता आहे. सुरवातीच्या दिवसांत विद्यार्थ्यांना गंभीरतापूर्वक अभ्यास करावा लागेल. शिक्षणासाठी किंवा व्यवसायासाठी परदेशात जाण्याच्या प्रयत्नात तसेच देशांतर्गत कार्यात अखेरच्या तीन दिवसांत विलंब होण्याची शक्यता आहे. संपत्तीसह आरोग्यसुद्धा महत्वाचे आहे, हे ध्यानात ठेवून पूर्वार्धात आरोग्याची काळजी घ्यावी लागेल. **महिलांना :** प्रकृतीबाबत, विशेषतः उष्णतेच्या विकारांबाबत सावध राहा. आरोग्याचा त्रास होऊ शकतो. वेळेवर जेवण घ्या, नातलगांकडून चांगली बातमी मिळेल. **शुभदिनांक :** ६,९.

कोणतेही वाद टाळावेत

मकर : मकरराशीसाठी या आठवड्याचे ग्रहमान पाहता शक्य असल्यास कर्ज किंवा उधारी करणे टाळावे. काही अनपेक्षित खर्च उद्‌भवल्याने आपणास कर्ज किंवा उधारी करावी लागण्याची शक्यता आहे. कामाच्या ठिकाणी किंवा सरकारी विभागात शक्यतो अधिकारी वर्गाशी व प्रतिष्ठित व्यक्तींशी वाद टाळावेत. कायद्याविरुद्ध असलेली कामे टाळावीत. भागीदारी संबंधात काळजी करण्यासारखे काही नाही. कुटुंबियांशी जवळीक साधू शकाल. शक्यतो कोणत्याही व्यक्तीशी वाद टाळण्याचा सल्ला देण्यात येत आहे. संपर्क साधताना सुद्धा पारदर्शकपणा व विनम्रपणा असण्याची गरज आहे. विशेषतः नंतर याची आपणास काळजी घ्यावी लागेल. विद्यार्थ्यांना अभ्यासात परिश्रम वाढवावे लागतील. आपण एखाद्या विषयाचा खोलवर अभ्यास करण्याचा विचार केलात तरी त्याची अंमलबजावणी करण्याची योग्य संधी न मिळाल्याने आपणास नैराश्य येण्याची शक्यता आहे. **महिलावर्ग :** आपल्या चेहेऱ्यावरील तेज काही अंशी कमी होण्याची शक्यता आहे. विशेषतः कोणते ना कोणते आजारपण आपणास त्रास देत राहील, त्यामुळे आरोग्याची काळजी घेणे गरजेचे ठरेल. **शुभ दिनांक:** ८,१२.

बोलण्यावर नियंत्रण ठेवा

कुंभ : कुंभराशीधारकांचे या सप्ताहातील ग्रहमान पाहता बेजबाबदारपणे कोणतेही कृत्य करू नका, धोका आहे. इतरांमधील दोष काढण्याचे कटाक्षाने टाळावे. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवल्यास आपल्याबद्दल गैरसमज होण्याचे प्रसंग टाळू शकाल. घरगुती संबंधात सान्निध्य टिकून राहील. आपण प्रणयी जीवनात अधिक मग्न राहिलात तरी नंतर आपल्या संबंधात वैविध्य राखण्यात व जोडीदारास खुश ठेवण्यात आपणास कष्ट करावे लागतील. अशा परिस्थितीत प्रसंगानुसार भेटवस्तू देऊन आपल्या जोडीदाराशी जवळीक साधू शकाल. धार्मिक कारणांसाठी खर्च होण्याची शक्यता आहे. शक्यतो कोणाशीही उधार उसनवारी करणे टाळावे. या दरम्यान काही ना काही कारणांनी अनेकदा प्रवास करावे लागतील. एखाद्या अनोळखी व्यक्तीकडून किंवा स्रोताकडून आर्थिक किंवा अन्य लाभ मिळवू शकाल. मात्र, शेअर्स किंवा तत्सम काम करणाऱ्यानी नंतर खूपच सावध राहावे लागेल, अन्यथा मोठ्या नुकसानास सामोरे जावे लागेल. **महिलांना :** प्रकृतीच्याबाबत चालढकलपणा करू नका. माणूस पारखण्याचे सूत्र पाळल्यास पश्चात्ताप करण्याची वेळ येणार नाही. **शुभ दिनांक-**८,९.

वागण्यात पारदर्शकता असावी

मीन : हा सप्ताहात मीनराशीसाठी एकूण ग्रहमान पाहता शेवटच्या दिवसांत व्यावसायिक व व्यक्तिगत संबंधात पारदर्शकता वाढवावी लागेल. प्रत्यक्ष शत्रूंचा जोर वाढेल, तेव्हा काळजी घ्यावी. व्यावसायिक भागीदारांशी संवाद साधताना थोडे सावध राहावे. विशेषतः शेवटच्या तीन दिवसांत नवीन करार टाळावेत. ज्यांना नाक-कान-घसा यांच्याशी संबंधित त्रास आहे त्यांनी या कालावधीत उपचारात हेळसांड करू नये. सामाजिक क्षेत्रात आपली वाहवा मिळवाल. आपल्या बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा, त्यामुळे गैरसमज वाढणार नाही. शेतीविषयक व स्थावर जंगमबाबतची कामे मार्गी लागतील. आपण वैभवी जीवनशैलीप्रती अधिक आकर्षित व्हाल, ज्यात खूप खर्च होण्याची शक्यता असल्याने खर्च नियंत्रणात ठेवावेत. अनैतिक संबंधांपासून दूर राहण्याचा सल्ला देण्यात येत आहे. मेदवृद्धी, मधुमेह इत्यादींशी संबंधित विविध समस्या होण्याची जास्त शक्यता आहे. **महिलांना** : अनावश्यक खर्च टाळा. घरगुती वातावरण चांगले ठेवता येईल. आपल्या विकासाची एखादी योजना आखणे आवश्यक आहे. धार्मिक कार्यात अधिक रस घ्याल. **शुभ दिनांक-** ११,१२.

चिंतन
प्रसाद केरकर
९८६७७२१११०

हिंदुस्थानी भाऊच्या निमित्ताने...

केवळ सोशल मीडियावरील आवाहनाला डोळ्यापुढे ठेवून काही तासातच लोक जमा होऊ आंदोलन करतील एवढी उत्स्फूर्तता आपल्याकडे आहे, असे वाटत नाही. त्यासाठी कोणाचा तरी निश्चितच छुपा पाठिंबा आवश्यक आहे. यासाठी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रस्त्यावर कुणीतरी या जमावाच्या मागे ठामपणे उभा असतो किंवा असला पाहिजे. एरव्ही मुंबईसारख्या अन्य महानगरात लोकांना फारसे कुणाचे देणे-घेणे लागत नाही. गेल्या काही वर्षात मुंबई तर आत्मकेंद्रित झाली आहे. आपल्या शेजारच्या फ्लॅटमध्ये कोण राहतो त्याची माहिती नसल्याबद्दल धन्यता मानणारे मोठ्या संख्येने मुंबईत असतात. मात्र, तरुण मुले सोशल मीडियाच्या एका हाकेवर जमा होतात व आंदोलनासाठी सज्ज होतात, हे सर्व अनपेक्षित असेच आहे. त्यामुळे सरकारने या भाऊला अटक केली असली तरी यामागे कोणत्या शक्ती आहेत, ते शोधले पाहिजे. त्यातून यामागचे खरे गुन्हेगार पुढे येतील.

एक हिंदुस्थानी भाऊ या टोपणनावाचा उटपसुंभ सोशल मीडियावर आपली हजेरी लावतो आणि १० व १२ च्या मुलांना आवाहन करतो की, 'तुमची ऑफलाईन नव्हे तर, ऑनलाईन परीक्षा झालीच पाहिजे, तसे जर सरकार करणार नसेल तर त्याविरुद्ध आंदोलन करा, रस्त्यावर या...' अर्थात, या आवाहनाला विद्यार्थी जोरदार प्रतिसाद देतात आणि मुंबईसह काही महानगरांत आंदोलन होते. या विद्यार्थ्यांना आवरण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीमार करावा लागतो. त्यानंतर लगेचच चॅनेल्सवर व सोशल मीडियावर बातम्यांचा, पाठिंब्यांचा पाऊस पडतो. जणू काही हीच एक खूप महत्त्वाची बातमी आहे व या आवाहनातून विद्यार्थ्यांच्या संवेदना जागृत झाल्या आहेत आणि आता बस्स... विद्यार्थ्यांचा सरकारशी संघर्ष अटळ आहे... विद्यार्थ्यांच्या मागण्या किती रास्त आहेत..इत्यादी... इत्यादी... यानिमित्ताने विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या गेलेल्या मागण्या आपण एकवेळ बाजूला ठेवू; परंतु सोशल मीडियाचा वापर कोणत्या थराला जाऊन पोहोचला आहे, त्याचा प्रत्यय गेल्या काही वर्षात आपल्याला अनेकदा आला आहे. आता त्याचे आणखी एक उदाहरण यानिमित्ताने बघायला मिळाले. मात्र, यासंबंधी अनेक शंका उपस्थित होऊ शकतात. केवळ सोशल मीडियावरील आवाहनाला डोळ्यापुढे ठेवून काही तासातच लोक जमा होऊ आंदोलन करतील एवढी उत्स्फूर्तता आपल्याकडे आहे, असे वाटत नाही. त्यासाठी कोणाचा तरी निश्चितच छुपा पाठिंबा आवश्यक आहे. यासाठी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रस्त्यावर कुणीतरी या जमावाच्या मागे ठामपणे उभा असतो किंवा असला पाहिजे. एरव्ही मुंबईसारख्या अन्य महानगरात लोकांना फारसे कुणाचे देणे-घेणे लागत नाही. गेल्या काही वर्षात मुंबई तर आत्मकेंद्रित झाली आहे. आपल्या शेजारच्या फ्लॅटमध्ये कोण राहतो त्याची माहिती नसल्याबद्दल धन्यता मानणारे मोठ्या संख्येने मुंबईत असतात. मात्र, तरुण मुले सोशल मीडियाच्या एका हाकेवर जमा होतात व आंदोलनासाठी सज्ज होतात, हे सर्व अनपेक्षित असेच आहे. त्यामुळे सरकारने या भाऊला अटक केली असली तरी यामागे कोणत्या शक्ती आहेत, ते शोधले पाहिजे. त्यातून यामागचे खरे गुन्हेगार पुढे येतील. ऑनलाईन परीक्षेबद्दल बोलायचे तर, कोरोनामुळे नाईलाज म्हणून सरकारला ऑनलाईन परीक्षा घेणे भाग पडले आहे. खरे तर, अशा परीक्षा घेणे हा एक प्रकारचा अनैतिकपणाच आहे. कारण, यातून आपल्याकडे त्या विद्यार्थ्यांची नेमकी क्षमता जोखता येणार नाही. ऑफलाईन परीक्षेत कॉपी करणारे असतात, त्यातुलनेत घरुन दिल्या जाणाऱ्या ऑनलाईन परीक्षेत तर कॉपी ही होणारच. त्यामुळे ऑनलाईन परीक्षा ही केवळ हंगामी व्यवस्था आहे. ती कायमस्वरुपाची नाही. आपल्याकडे परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या तपासणीसाठी होत नाही, तर जास्तीत जास्त गुण मिळवून भविष्यातील करिअर घडविण्यासाठी घेतली जाते. आपल्याकडील शिक्षण व्यवस्थेतील हा मूलभूत दोष समजला गेला आहे. परंतु, गेल्या काही वर्षांत गुणांना एवढे अवास्तव महत्त्व दिले गेले व जीवघेणी स्पर्धा त्यासाठी सुरु झाली. त्यात विद्यार्थ्यांबरोबर पालकही सामील झाले. आपल्या शिक्षण व्यवस्थेच्या या दोषामुळे अनेकदा आपण चांगले विद्यार्थी घडवित नाही, तर गुणवत्तेवर आधारित चांगले मार्क मिळविणारेच विद्यार्थी चमकविले जातात. केवळ चांगले मार्क मिळविले की तो विद्यार्थी हुशार हे एकदा गणित मान्य झाल्यावर विद्यार्थी आणि त्यांचे पालक व शिक्षकांचाही दृष्टीकोन बदलतो. सध्याच्या ऑनलाईन परीक्षेमुळे विद्यार्थ्यांचीच एक प्रकारे मजाच झाली. सर्वच विद्यार्थी कॉपी करतात असे म्हणणे चुकीचे ठरेल; परंतु मार्क्स मिळविण्याच्या या गर्दीत आपणही कॉपी करुन चांगले मार्क मिळवू, अशी सर्वसाधारण धारणा विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणे स्वाभाविक आहे. आपण जो अभ्यास शिकतो, तो आपल्या ज्ञानार्जनासाठी आहे व त्या ज्ञानाच्या आधारावर आपल्याला भविष्यात करिअर घडवायचे आहे, अशी भावना सध्याच्या शिक्षणव्यवस्थेतील दोषामुळे विद्यार्थ्यांमध्ये नाही. गेल्या काही वर्षात आपल्याकडे गुण जाऊन ग्रेड देण्यास सुरुवात झाली. परंतु, ग्रेड हीदेखील मार्क्सच्याच आधारावर दिली जात असल्याने त्या ग्रेड पद्धतीचे रुपांतर मार्क्समध्ये केले जाते व विद्यार्थ्यांची क्षमता तपासली जाते. त्यामुळे आपल्याकडे सध्याच्या शिक्षण व्यवस्थेचा पॅटर्नच बदलण्याची आवश्यकता आहे. केवळ दहावी-बारावी-पदवी असा पॅटर्न बदलून पूर्वीचा अकरावीचा पॅटर्न आणून हे काम होणार नाही. ज्या प्रकारे अभ्यासक्रम बदलला जाण्याची गरज आहे, तसेच प्रत्येकाच्या क्षमतेनुसार त्याला शिक्षण घेण्याची व्यवस्था असली पाहिजे. सर्वच विद्यार्थ्यांना एकाच तागडीत घालून त्यांची परीक्षा घेऊन गुणांवर आधारित त्यांचे मापन करणे म्हणजे हुशार व ढ अशा दोन्ही विद्यार्थ्यांवर अन्याय करण्यासारखे आहे. एखादा विद्यार्थी शिक्षणात कमी असेल तर त्याचा नेमका कल कोठे आहे, ते जाणून घेऊन त्याला त्यातील ज्ञान देण्याकडे कल असला पाहिजे. त्यासाठी सध्याचा अभ्यासक्रम व परीक्षा पद्धतीत बदल करण्याची आवश्यकता आहे. ऑनलाईन परीक्षा घेण्यासाठी हे जे कथित आंदोलन झाले, त्याचे मूळ शोधताना आपल्याकडील अभ्यासक्रमाकडेही पाहण्याची गरज आहे. विद्यार्थांवर परीक्षेचा व त्यानंतर पास-नापास व उत्तम गुण मिळविण्याची स्पर्धा याचा बोजा असता कामा नये, मार्क्स कमविण्याची धडपड असता कामा नये. परीक्षा ही ज्ञानप्राप्तीसाठी आहे, दुसऱ्या मुलांशी स्पर्धा करण्यासाठी नाही, असे एकदा मनावर बिंबविले की, मुलांपुढे परीक्षेला कितीही कॉप्या समोर ठेवल्या तरी ती करण्यास मुले धजावणार नाहीत. अशा पद्धतीची शिक्षण पद्धती आपल्याकडे ज्यावेळी विकसित होईल, त्यावेळी खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांचा विकास होईल.

दृष्टिक्षेप
अतुल गुळवणी
९२७०९२५२०१

मोहोर

कुटुंबाची 'नाळ' तोडू नका

कुटुंब आणि कुटुंबातील प्रत्येक घटकाशी असलेले नाते हे अत्तरासारखे सुवासिक असावे. ते अत्तर कुपित ठेवून चालणार नाही. तसेच राहिले तर त्या अत्तराचा सुवास उडून कधी गेला हे कळणारच नाही. उलट, ते नात्याचे अत्तर सर्वांना थेंब-थेंब जरी लावत राहिलो, तरी त्याचा सुगंध निश्चित सर्वत्र बहरेल आणि नातेसुद्धा सुवासिक होईल. कुटुंब पद्धत एकत्र असो वा विभक्त त्यामध्ये प्रत्येकाकडे नात्याचे अत्तर असते. फक्त त्याचा विनियोग कसा करायचा, हे प्रत्येकाला समजले तरी पुष्कळ आहे. नात्यांचा हा सुवास असाच दरवळत राहिला तरच नव्या पिढीतसुद्धा आपल्या कुटुंबाचा हा अत्तररुपी सुवास दरवळत राहील. बघूया प्रयत्न करुन...

सध्याच्या जमान्यात विभक्त की एकत्र कुटुंब पद्धत चांगली यावर बराच खल सुरु असतो. अर्थात, दोन्ही कुटुंब पद्धती चांगल्याच आहेत. मात्र, दोन्ही व्यवस्थेत राहणाऱ्यांनी परस्परांना समजावून घेतले तर निश्चितच दोन्ही व्यवस्थेत राहणारी मंडळी आनंदात राहू शकतात. अर्थात, यासाठी सामंजस्यपणा महत्त्वाचा आहे. तो जर नसेल, तर दोन्ही कुटुंबव्यवस्थेत एकोपा हा राहातच नाही. सुदैवाने महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात अजूनही मोठ्या प्रमाणात एकत्र कुटुंब तग धरुन आहे. नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने कुटुंबातील सदस्यांचे गावापासून, घरापासून दूर स्थलांतर झाले असले, तरी घराशी, गावाशी जोडलेली नाळ काही तुटलेली नाही.विविध धार्मिक उत्सव, कुटुंबातील कोणतेही शुभ-अशुभ कार्य असो, यावेळी हमखास कुटुंबातील सर्व सदस्य एकत्र आल्याचे दिसून येते. त्यावेळी निर्माण होणारा एकोपा निश्चितच कुटुंबवाढीसाठी उपयुक्त ठरणारा आहे. सध्याची पिढी ही गतिमान आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून ही पिढी मोठ्या प्रमाणात सक्रिय झाली आहे. मात्र, त्याच सोशल मीडियामुळे दुरावलेली कुटुंबेही अनेक ठिकाणी एकत्र आल्याचे दिसून येते. त्याच सोशल मीडियाचा आधार घेत नव्या पिढीलाही आता आपल्या कुटुंबाविषयी आस्था वाटू लागली आहे. हेही नसे थोडके.

आजकाल मुलीच्या लग्नाची काळजी करण्यापेक्षा मुलाच्या लग्नाची काळजी करण्याची वेळ आई-वडिलांवर आली आहे. त्याचं कारणही तसंच आहे. आजकाल मुलीकडचे मुलाकडच्यांना तुम्ही कुठे दुसरं घर घेतलं आहे का, असं विचारतात. म्हणजे, हल्ली मुलीलाच वेगळा संसार थाटायचा असतो. मुलाचा वेगळा ब्लॉक, संसार पाहूनच मुलाच्या लग्नाला होकार देतात. खरं म्हणजे, एकत्र कुटुंबात त्यांना राहायचं नसतंच. खरं म्हणजे, घरात कोणी असेल, सून कामावर जात असेल, तर घरात सासू बऱ्याचशा जबाबदाऱ्या पार पडतात. सासरे-दीरदेखील एखादी वस्तू आणायची असेल किंवा बँक वगैरे अशा कोणत्या ठिकाणी जायचं असेल, मात्र जमत नसेल तर ती कामं करतात. एकट्यावर व्यवहार पडत नाही. सगळ्यांनी मिळून मिसळून एकत्रपणे घरखर्च चालवला जातो. मुलं घरात असतील तर त्यांना हवं नको ते पाहिलं जातं. घरी कोणी पाहुणे आले, की त्यांची विचारपूस करणं, प्रेमाने-आपुलकीने वागलं जातं. पण, सून जर कामावर जाणार असेल, तर मात्र घरी कोणीच कधी येऊ शकत नाही. आपल्या घरीही पाहुणे येत नाहीत. केवळ फोनवरूनच बोलावं लागतं. कामावरून दमून आल्यावर रात्रीच्या स्वयंपाकाची चिंता नसते. आपण कुठेही बिनधास्तपणे फिरू शकतो. गावाला जाऊ शकतो. थोडक्यात काय तर, घरच्या जबाबदाऱ्या विभागून मिळतात. हेच जर आपलं विभक्त कुटुंब असेल, तर मात्र या कोणत्याच गोष्टी होत नाहीत. सगळी कामं आपल्यालाच करावी लागतात. कितीही दमून भागून घरी गेलं तरी लगेच गॅसजवळ उभं राहावं लागतं. आजकाल हॉटेलमध्ये जाण्याचं प्रस्थ वाढलं आहे म्हणा! पण, रोज-रोज किती वेळा हॉटेलमध्ये जाणार? हा प्रश्न शेवटी असतोच की. म्हणूनच एकत्र कुटुंबात राहण्याचा विचार करावा. एकत्र कुटुंबात वास्तव्याने नव्या पिढीवरही चांगले संस्कार होतात. आपले कोण, हे त्याला चांगले उमगते. लहानपणी झालेले संस्कार हे आयुष्यभर पुरणारे असतात. अनेक कुटुंबांत आजी-आजोबांची माया, प्रेम मिळणारी नातवंडे खरोखरच भाग्यवान समजली जातात. आजी-आजोबांसाठी नातवंडे ही दुधाच्या सायीसारखी असतात. त्यामुळे ती साय आहे तशीच रहावी, दूध खराब होऊ नये म्हणून आजी-आजोबा जीवापाड जपत असतात. त्या नातवंडांनादेखील आजी-आजोबांविषयी कमालीचा लळा लागतो. त्यामुळे अनेकदा कुटुंबात निर्माण होणारा दुरावा कमी होताना दिसतो. अर्थात, दोन्ही बाजूंनी जर सामंजस्य दाखविले, तर खरंच एकत्र कुटुंब पद्धत निश्चितच फायद्याची ठरणारी आहे. घरात जास्त लोकं असली की कामंसुद्धा पटपट होतात. मोठ्या कुटुंबाचे अन्यही काही फायदे आहेत. त्यात कामाचा ताण एकावर पडत नाही. घरात आर्थिक चणचण असेल तरीदेखील त्याचा भार एकावर पडत नाही. एकत्र कुटुंबात निर्णय घेण्यासाठी खूप जणांची मतं असतात. त्यामुळे चुकीचा निर्णय घेण्यापासून तुम्हाला वाचवण्यासाठी खूप जण असतात. लहान मुलांची काळजी मोठ्या कुटुंबात अगदी सहज घेतली जाते. त्यामुळे कोणावरही तसा ताण येत नाही. लहान मुलांपासून ते तरुणांपर्यंत सगळ्या मुलांवर घरातील प्रत्येकाचे लक्ष राहते. आजी-आजोबा, काका-काकी यांच्या सान्निध्यात राहायला मिळाल्यामुळे संस्कारही चांगले मिळतात. यासाठी एकत्र कुटुंबात प्रत्येक नात्याचा मान ठेवणे फार गरजेचे असते. त्यामुळे तुमच्या सख्ख्या लोकांपुरते हे नाते मर्यादित राहात नाही. तुम्हाला सगळ्यांचे ऐकणे भागच आहे. घरात एखादा कार्यक्रम असेल, तर तुम्हाला त्याची जबाबदारी घ्यावी लागते. तुमच्या जबाबदाऱ्या तुम्हाला झटकून चालत नाही. त्या जबाबदाऱ्या घ्याव्या लागतात. घरातील प्रत्येक व्यक्तीला समान मान देणे गरजेचे आहे. घरात आवडीची व्यक्ती असली तरीदेखील सगळ्यांशी सौख्य ठेवणेच गरजेचे असते. मोठ्या कुटुंबात राहताना बरेचदा आपलासा वेळ मिळत नाही. अशावेळी तुम्ही चिडचिड न करता तुम्हाला त्या सगळ्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. तुम्हाला नक्कीच तुमच्यासाठी हवा असलेला वेळ हा मिळतो. पण, एखाद्यावेळी तुम्हाला हा वेळ कदाचित मिळू शकत नाही. त्यामुळे थोडा समजूतदारपणा वाढवावा लागतो. घर म्हटले की, थोडी भांडणं आणि राजकारण आलेच. या राजकारणात पडण्यापेक्षा तुम्ही त्यातून मार्ग काढणे गरजेचे असते. कोणत्याही गप्पांमध्ये न पडता तुम्ही जर आहे ती परिस्थिती निभावून नेली की, तुमच्यावर विश्वासही अधिक बसतो. आता मोठे कुटुंब असेल तर तुम्ही या काही गोष्टी लक्षात ठेवा, म्हणजे तुमच्यावर मुळीच ताण येणार नाही. दुर्दैवाने गेल्या काही वर्षात या एकत्र कुटुंब पद्धतीला छेद जाऊ लागला आहे. नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने एकत्र कुटुंबांचे मोठ्या प्रमाणात स्थलांतर होऊ लागल्याने सारेजण गावापासून, घरापासून दूर जाऊ लागलेले आहेत. त्याचा विपरित परिणाम एकत्र कुटुंब पद्धतीवर झाला आहे. घराला घरपण देणारी वडीलधारी मंडळीही निवर्तल्याने त्या घरांची रयाच निघून गेलेली आहे. आता घरे फक्त नावापुरती उरलेली आहेत. शेतीचेही विभाजन झाल्याने अनेकांनी शेती विकून टाकली आहे. त्यामुळे गावाशी, घराशी जोडलेली नाळ तुटू लागली आहे, हे नाकारुन चालणार नाही. ती नाळ पुन्हा जोडणे आता कुणाच्याच हातात राहिलेले नाही. गावातील घरे आता केवळ आठवणीपुरतीच उरली आहेत. हे वास्तव कुणीही नाकारु शकत नाही. ज्यांचे बालपण एकत्र कुटुंबात गेलेले आहे, त्यांना हे शल्य कायमचे बोचत राहते, हे नक्की.

कवडसे
मंगल आठवले-गोगटे
९८२००००२४

रसाळ व चविष्ट आद्यसंस्कृती

आशा आठवणी म्हटलं की पहिली आठवण येते ती सगळ्या गोष्टी जिथे बनत त्या स्वयंपाकघराची. भरपूर जागा असलेल्या खोलीची जी घराच्या इतर भागांइतकीच महत्त्वाची होती. जिथे बसून घरातील मंडळी जेवू शकत होती. खूपदा तर जेवणाची छोटीशी पंगत तिथेच बसायची. आमचं जेवणाचं टेबल तिथेच स्थित होतं. बाहेर जाऊन खाण्याची पद्धत नसताना घरातली गृहिणी दिवसाचा बराचसा वेळ तिथेच घालवत असे. गावात फारशा सुधारीत सोयी नव्हत्याच. (अजूनही गावात एखाद कॉफी शॉपसुद्धा नाही.) रेस्टॉरंटमध्ये जायची पद्धत नव्हती. त्याला आम्ही 'हॉटेल' म्हणत असू. घराबाहेर जाऊन जेवायची पद्धत नव्हती. गेलं तरी कुणी बोलावलं जेवायला तर. तेही त्यांच्या घरी! आता असतात ती सैपाकघरं. जिथे जेमतेम उभं राहून कधीतरी थोडासा सैपाक बनवला जातो. अनेकदा तर तो बाहेरून मागवला जातो वा घरातली मंडळी उठून बाहेर जेवायला जातात.

मनात असलेल्या स्वयंपाकघराचं चित्र आईशिवाय पुरं होत नसे. बाहेर खाणं हा आचरटपणा वाटे, अयोग्य वाटे. त्यावेळी घरातच अनेकविध पदार्थ बनत. माझ्या बऱ्याचशा मैत्रिणींच्या आया गृहिणी होत्या. घरी बनवलेल्या वस्तू एकमेकांच्या घरी पाठवायची पद्धत होती त्या काळात. पानात पडेल ते खायची तयारी असावी लागायची, नाहीतर उपाशी राहण्याचा प्रसंग ओढवू शके.

आई, आमची वा तेव्हाच्या घरांतील आई, बनवत असलेले पदार्थ आता कुठे मिळत नाहीत, असं आता वाटू लागलंय. साधे पोहे घ्या. कुठे लागते ती चव? तसं तर भाज्या तरी तितक्याच छान व चविष्ट कुठे लागतात?

पोह्यांचे किती प्रकार बनवले जायचे! दोन प्रकारचे पोहे कायम मिळायचे- जाडे व पातळ. कोणत्याही प्रकारचे पोहे बनवायचे असले तरी पहिली गरज असायची ती गिरणीतून आणलेले ताजे, छानसा ताजा खमंग वास येणाऱ्या पोह्यांची. कांदे पोहे, बटाटे पोहे, वांगी पोहे, तोंडली पोहे हे तर सर्वसाधारणपणे घराघरात मिळणारे. पण, पोहे तिथे थांबत नाहीत तर ते इतरही विविध रुपात तुमच्यासमोर हजर होतात. अफलातून चवीचे दडपे पोहे हा ताजं-ताजं करून खाण्याचा पदार्थ. शिवाय, राजस कोळाचे पोहे आहेतच तुमचं दिल खूष करायला. जवळजवळ प्रत्येकाच्या घराशी एक नारळाचं झाड असायचंच. एकदा खाल्ले हे पोहे तुम्ही की परत-परत मागणारच. गोड खावंसं वाटलं तर दूध पोहे, दही पोहे आणि गूळ पोहे आहेतच. गूळ पोह्यांमध्ये नारळ घालताना कंजूषी करायची नाही बरं! आणि यातही कुठे जाडे व कुठे पातळ पोहे वापरायचे त्याचं गणित मात्र जमायला हवं. आताच्या जमान्यात महाजालकावर पोह्यांचे डोसे आणि इडल्यादेखील दाखवतात. शिवाय, टिकाऊ असे पोह्यांचे पापड व मिरगुंड असतातच की. चिवडा हा असाच एक फार जास्त नाही, पण तरीही बऱ्यापैकी टिकाऊ पदार्थ. त्यातही तळलेल्यापेक्षा कच्च्या पोह्यांचा चिवडा मला भावतो. माझ्या एका मैत्रिणीची (रजनी जोशी) आईदेखील पातळ पोह्यांचा चिवडा छान बनवायची. तिच्या चिवड्याची पहिली चव घेणाऱ्या आम्हीच दोघी होतो. चिवडा छान कुरकुरीत बनवायचीदेखील एक पद्धत आहे. त्यासाठी पोहे आधी वाळवून वा भाजून घ्यावे लागतात. माझ्या आईला ती मस्त जमलेली होती. तिने चिवडा केला की तर मी जेवणाऐवजी चिवडा खात असे.

वांग्याचे काप हा असाच एक पदार्थ. कोर्लई-बोर्लईची वांगी हा काय प्रकार तो खाऊनच बघायला हवा. त्याचं केलेलं भरीतदेखील असंच शानदार लागतं. साधं बेसन लावून केलेले काप तर कसे करायचे, हे इकडे कळतच नाही. कुणालाही माशाचे तुकडे म्हणून खाऊ घालावेत. जरा जांभळटसर असलेली ही वांगी बाजारातही मनमोहक वाटतात. वालाचं पीक त्या भागात भरपूर. इथे मिळतात ते पावटे आणि त्याच्या डळिंब्या, जरा शिजल्या की मोडून पीठ होणाऱ्या. अलिबागला मिळायचे ते कडवे वाल. त्याच्या डाळिंब्या उसळ केल्यावर कशा टपोऱ्या दिसतात! माझी आई त्याची आमटी बनवायची तशी मिटक्या मारू आमटी मला मात्र बनवता येत नाही.

तशीच नाही बनवता येत ती पानगी. कारण, ती बनविण्यासाठी लागतात केळीची जाडसर पानं. पानगी हवी म्हटलं की आई दारातील केळीच्या झाडाचं एक पान कापून लगेच पीठ भिजवून त्याची पानगी बनवे. इथे हवं तसं केळीचं पान हवं तेव्हा मिळणंच केवढं कठीण! इतर वेळेला फुकट जात असलेल्या कुठल्याशा झाडाचं पान मागितलं की त्या पानाला भयंकर भाव येतो, हे इथे आल्यावर माझ्या लक्षात आलं आहे. आमच्याकडे तर आई असंदेखील सांगायची, जा गं जरा मीराकडून अळूची पान घेऊन ये. आज अळूच्या वड्या करीन म्हणते. मीराकडे गेलं की तिची आई त्यांच्या नोकराला हाक मारून म्हणायची, दे रे हिला काय पाहिजेत ती पानं. मग तो बरोब्बर द्यायचा ती. शेजाऱ्यांशी अगदी साधं बिनागाठीचं नातं असायचं.

पोपटी दोन प्रकारची बनायची. एक शेतातली शेकोटी पेटवून केलेली आणि दुसरी घरातल्या पातेल्यात बनलेली. दोन्हींमध्ये वापरायच्या भाज्या त्याच, पण पोपटीची चव वेगळी. त्यात मुख्य म्हणजे, ताज्या वालाच्या शेंगा लागायच्या. त्यादेखील किड नाही याची खात्री केलेल्या. त्यामुळे शेंगा किंचितशा उघडून त्या वापरल्या जात. शेतातल्या पोपटीसाठी नियोजनाची गरज लागे, कारण ती बनविण्यात अनेकांची गरज लागे. घरात बनवण्यासाठी पहिली गरज असे एका मोठ्या पातेल्याची. शिवाय, घरातल्या पोपटीत बरंच तेल लागे. शेतातल्या पोपटीत मात्र तेलाची गरजच नव्हती. आता चव फक्त आठवण राहिली.

कोयाडंसुद्धा असंच. किती साधं जेवण असायचं ते- कोयाडं आणि भात. भात नेहमीचाच. कोयाडं मात्र रायवळ आंब्यांचं. रायवळ आंबे हे अगदी साधे. फारशी किंमत न मिळणारे. अगदी लहान ते हापूसच्या आकारापर्यंतचे. जरा लहान असले की खूप खाता यायचे. समोर भरपूर आंबे घेऊन बसायचं आणि दर आंब्यागणिक वेगळी चव असणारे रायवळ आंबे चाखायचे, हा एक चवीने खाण्याचा उत्सव होता. कितीही हापूस-पायरी खाल्ले तरी रायवळची गंमत वेगळीच. ते विकत आणले व खाल्ले नाहीत असा आंब्यांचा हंगाम गेला नाही कधी.

तसंच विलायती फणसाबद्दल. हा फणसच वेगळा. आत गरे नसलेला. आकाराला जरा लहानच. त्याची भाजी मस्त व्हायचीच. आई तर त्याचे वेफर्स आणि कटलेट्सही बनवायची.

सगळंच छान लागायचं. पांढऱ्या कांद्यांची भरून भाजी, वाळूतल्या मेथीची भाजी, कच्च्या करवंदांचं गोड लोणचं, आंबवणी, सगळंच आठवणीत भरुन राहिलंय. अर्थात, ताटात वाढलं असेल ते सगळं खायची पद्धत होती, त्यामुळे समोर येईल ते सगळं खाऊन पाहायची संस्कृती अंगवळणी पडली होती. म्हणूनच तर कधी कुठे अडलं नाही जेवताना.

mangalgogte@gmail.com

शब्दगंधा
शशिकांत मुद्देबिहाळकर
९७६७१५२६०८

तू सौभाग्यवती!

स्त्रीने केव्हा कसं असावं, ते ती तिच्यासमोर असणाऱ्या परिस्थितीवर अवलंबून असतं, हे तिच्यातील तिने घडवून आणलेल्या अपरिहार्य बदलावरून कळतं. ते बदल करीत असताना, ती स्वत्वाशी कधीही तडजोड करीत नाही. तिचं स्त्रीत्व ती जपते.

खरं तर, ती सुखी कुटुंबात जन्म घेते. लाडाकोडात मोठी होते. चांगले शिक्षण घेते. आईबाबांची लाडकी लेक लग्नाच्या वयात येते. सुंदर दिसू लागते. कोणाची दृष्ट लागण्याच्या आत आईबाबा चांगलं स्थळ पाहून लग्न ठरवतात. तसं तर लग्नाच्या गाठी स्वर्गातच बांधतात, यावर आईबाबांचा विश्वास असल्याने ते सांगतील त्या तरुणाच्या गळ्यात ती माळ घालते आणि सौभाग्यवती होते. राजबिंडा नवरा आणि सधन कुटुंबात, अर्थात ती सुखी होते, असा सर्वसाधारण समज असतो. स्त्रीचा विवाह झाला की तिला सौभाग्यवती म्हणण्याची आपली पारंपरिक परंपरा आहे. हे सौभाग्यवती पद ती स्वतः किंवा तिचा नवरा मरेपर्यंत तिच्या नावापाठीमागे लागतं, हा एक प्रकारे हिंदू संस्कृतीतील तिच्या पाठीशी सदिच्छा ठेवण्याचा एक संस्कार आहे. नाही तर, इंग्रजीत विवाह झालेल्या स्त्रीला मिसेस म्हणण्यात येते. म्हणजे, ती कुमारिकेची (मिसची) मिसेस म्हणजे श्रीमती होते. आपण नुसते श्रीमती होणे पसंत करीत नाही, तर विवाहानंतर ती अधिक भाग्यवान, म्हणजे सौभाग्यवती हे पद बहाल करतो. किती स्त्रियांना सर्वकाळ हे सौभाग्य लाभतं, याचा गंभीरपणे कोणालाच प्रश्न का पडत नाही? केवळ 'प्रारब्ध' असं म्हणून आपण ते सोडून देतो, हे कितपत योग्य आहे? अशा स्त्रियांचं आयुष्य कसं असतं, याचा क्षणभरसुद्धा विचार करण्याची खरंच गरज नाही का? असे प्रश्न पडून नक्की आपण काय करणार? याचं उत्तर मिळत नाही, हेही खरं आहे. अशी ही निरुत्तर करणारी एक जटिल समस्या समाजात असते. सौभाग्यवती हे पद नावापाठीमागे लावून जगणे, हा अनेक स्त्रियांवर खरं तर अन्याय असू शकतो. आईबाबांनी सांगितलं म्हणून किंवा प्रेमात पडून विवाह झालेल्या अनेक सौभाग्यवतींचे संसार भाग्यवतीचे संसार म्हणता येत नाहीत, हे समाजातील एक कटू सत्य आहे. यापैकी अनेक संसारांना दुर्भाग्याच्या वाटेवर नेणारी पतीची व्यसनाधीनता हे एक जसे प्रमुख कारण आहे, तसेच पतीचे आजारपण, कुटुंबातील दुफळी, भेदभाव, कुटुंबात सुनेला कमी लेखणे किंवा कधी कधी सुनेचे कुटुंबावरील वर्चस्व, सासू-सुनांची भांडणे, सुनेच्या आईकडून कुटुंबातील होणारा दररोजचा हस्तक्षेप, अशी अनेक कारणे आहेत. प्रत्येक स्त्रीचे विवाहानंतर कुटुंब बदलते व नव्या कुटुंबात तिला जुळवून घ्यावे लागते. दुधात साखर मिसळावी व ते गोड व्हावे इतके मिसळून जावे लागावे, हे अपेक्षित असते, तसे अनेक मुली सर्व काही सोसून, स्वतःला बदलून संसार गोड करतातही; परंतु त्यांची होणारी कुचंबणा त्या सहन करीत असतात, याची जाणीव कुटुंबाला असणे आवश्यक असते. विवाह करून सासरी येताना असलेले तिचे गोंडस रूप सासरकडील अनेक समस्यांनी काळवंडून जाते, निस्तेज होते. हे सासरकडील मंडळींच्या लक्षात येतही नाही. हे एक वास्तव असते. हेच तिच्या आईबापाचे दुःख असते. 'तू तेव्हा तशी! तू तेव्हा अशी!' या आठवणी मनात रुंजी घालत लेकीचा संसार तिचे आईवडील पाहात असतात. लेकीचे दुःख पाहणे एवढेच आईवडिलांच्या हातात असते. टवटवीत बहरलेले फूल कोमेजून गेले, अशी त्यांची भावना असते! 'ती आणि तिचे नशीब!' असे म्हणून सोडून देण्याशिवाय त्यांच्याकडे काही पर्याय नसतो. मुलीही त्यांचे दुःख व्यक्त करीत नाहीत. त्या दुःखालाही त्या जणू साजरं करतात. त्या स्वतः बदलतात, पतीला किंवा सासरला हवं तसं जगतात. हे जगणं आनंदाने स्वीकारतात. स्त्रियांचं हे असं जगणं. खरं तर, वेदनादायक आहे ते समजून घेणारी माणसं नशिबात असतील तर, ते सौभाग्य आणि ती स्त्री खरी सौभाग्यवती असं म्हणायला हवं!

एका सर्वेक्षणानुसार, आनंदात संसार करणाऱ्या स्त्रियांची टक्केवारी केवळ बासष्ट टक्के इतकीच आहे. त्या संसारात दुःखी असणाऱ्या कारणांच्या टक्केवारीत पंधरा टक्के व्यसनाधीन पती, सहा टक्के कुटुंबातील कलह, पाच टक्के सासू-सून वाद आणि अकरा टक्के इतर कारणे अशी आहे. ही टक्केवारी पाहिली तर, केवळ बासष्ट टक्के स्त्रियांना खऱ्या अर्थाने सौभाग्य लाभले आहे, असे म्हणावे लागेल. आडोतीस टक्के स्त्रियांना परिस्थितीशी झगडावे लागते आहे.

आठवण
डॉ. रमेश वार्डे
९३२६००४७४३

नगरसेवकांचे पहिले काम

नाव देणे, अर्थपूर्ण नाव बदलणे, हा सर्वात मोठा विकासाचा विषय मानून त्याप्रमाणे नगरसेवक झाल्यावर कामाला लागायचे व आपण किती नावे बदलाचे ठराव दिले, हे सांगत राहावयाचे. जुने नाव बदलणे अथवा नवीन नाव देणे, यापेक्षा विकास कोणत्या नगरसेवकाने केला, या गोष्टीला फारच महत्त्व दिले जाते. कारण, त्या नावावरुनच मिळणारा बोध हा आता कसा उपयुक्त आहे व पक्षाला फायदेशीर आहे, हे पाहिले जाते. पक्षाला आताही त्या नामकरणावरुन मते मिळणार असतील तर ते काम चांगले समजायचे व त्या व्यक्तीचा आताही जयजयकार करीत रहायचे. त्यातून मते मिळविण्याचे ध्येय साध्य करावयाचे, असे राजकारण पक्षाचे नगरसेवक उमेदवार उत्तम प्रकारे करीत असतात. या निवडणूक प्रक्रियेत अडकलेल्या उमेदवारांना याचे चांगले ज्ञान असते. त्या मतदार संघाच्या ठराविक विभागात ज्या समूहाची वस्ती असते, तेथे जाऊन त्यापूर्वी होऊन गेलेल्या नेत्याचा जयजयकार करून मते पदरात पाडून घ्यावयाची, नंतर तो विषय सोडून द्यायचा. कारण, निवडून देणे हे काम झालेले असते. नाव बदलण्याचा किंवा नाव देण्याचा विषय पुढच्या निवडणुकीच्या वेळी पुन्हा निर्माण होतो, तोपर्यंत सारे शांत असते. असे दहा-पंधरा विषय असतात, की त्या विषयाचा उजाळा देणे म्हणजे शिळ्या कढीला उकळ देणे, हे काम घडते. आता महापालिकांच्या निवडणुका लागणार असल्यामुळे शिळ्या कढीला ऊत दिला जात आहे. तो क्षणभंगुर आहे, हे सर्व लबाड पुढाऱ्यांना माहीत आहे. त्यामुळे तर जो वाद निर्माण होतो, तो शांत करणे, हे कामही हेच जुने नगरसेवक करतात. अशाप्रकारे खोटे उपद्व्याप करून त्यातून कार्यभार साधला जातो. साऱ्या रस्त्याला एक नाव दिले म्हणजे तो विषय संपला. दर पाच वर्षांनी हा विषय विकासाच्या नावावर चर्चेला घेऊन काही उपयोग होत नाही. उलट, तेच-तेच काम केल्याची नोंद होते व लोक त्यांना मते देतात.

मते मिळविण्यासाठी हा अपरांपरागत धंदा व्यवस्थित चालू असतो. नगरसेवक निवडून येतात, पुन्हा पाच वर्षांनी निवडून येताना रस्त्यांना, मैदानाला नावे दिली जातात. याचा तर काहीच फायदा झालेला नसतो. मतदानाचा व्यवहार होत असतो व आपण त्याला लोकशाही मानतो.

लोकशाही म्हणजे काय, हे या नगरसेवकांना माहीतच नसते. यास आपण लोकशाहीचा शिक्का देऊनच बसतो. पुढे हेच नगरसेवक प्रतिष्ठित होतात व हे कार्य असेच चालू राहावे, म्हणजे नाव बदलणे, ही नगरसेवकांची सेवा असते व ती ते व्यवस्थित पार पाडीत असतात. मतदार निमूटपणे पाहात असतात. मतदारांनाही काही कळलेले नसते. नगरसेवक तर व्यावसायिकच झालेले असतात. ही निवडणूक प्रक्रिया आपण पुढे नेत असतो. अशाप्रकारे या लोकशाही प्रक्रियेला लबाडीने वागून पैसे मिळवीत असतात. म्हणजे, राष्ट्रीय वृत्ती किंवा लोकशाही पदवी यांना इथे काहीच नसते. सारे फक्त त्यांचे राज्य असते व त्यांना लोकशाही राज्य पद्धतीबाबत काही आदर नसतो. परंतु, हा पुतळा बसविण्याचा किंवा मैदानाला नाव देण्याचा विषय आवश्यक असतो. तेव्हा तो अत्यंत हुशारीने मोठ्या नेत्यांकडून काढला जातो व एकदा ठिगणी पडली की वाद भडकण्याचे काम होते. आणि मग नवीन वाद रंगत जातात. नवीन वादाची त्यात भर पडते आणि सामाजिक वातावरणात बिघाड करण्याचा प्रयत्न असतो व ते वातावरण बिघडलेली ते आपल्या मनाप्रमाणे वळवून घेत आपली पोळी भाजून घेत असतात. वास्तविक, पन्नास वर्षे आधी पक्षातर्फे हाताळलेला प्रश्न पुन्हा हाताळण्याची आवश्यकता नसते; परंतु नवी मते मिळविण्यासाठी ती गरज असते. त्यासाठी हा प्रश्न मैदानाला नाव देण्याचा निर्माण केला जातो. अर्थात, उमेदवार हे निवडून येण्यास उत्सुक असल्यामुळे यातील गुंता त्यांना समजत नाही व निवडणुका होऊन जातात.

अशाप्रकारे नाव देण्याच्या मुद्द्यावर किंवा नाव बदलण्याच्या मुद्द्यावर निवडून आलेले सभासद हे प्रामाणिक स्वरुपाचे ज्ञान असलेले असतात. या नवीन नगरसेवकांना काही धोका नसतो व त्यांचेही काम झालेले असते. पक्षाचे किती नगरसेवक आहेत, याला महत्त्व असते. अशाप्रकारे नाव देणे, नाव बदलणे, हा एक तांत्रिक विषय आहे असे वाटते. त्या विषयाला तसे रुपांतरीत केले जाते व नाव बदलणे, नाव देणे हा विषय तेवढ्यापुरता उपयुक्त ठरतो.

जुने नगरसेवक यामध्ये अनुभवी असतात. त्यांचा निवडणुकीचा मार्ग हा वेगळा असतो. नवे नगरसेवक हे शिकाऊ वृत्तीचे, नवखे असतात. एकूण नवे व जुने नगरसेवक यामध्ये अंतर्गत वाद असण्याचा संभव असतो. नवीन नगरसेवक हे नवखेच राहात असतात.

पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
९२७३३४३१७७

मनस्वी व्यक्तिमत्त्वाचे दर्शन

हमीद



अनिल अवचट यांचे हे छोटेसे पुस्तक, अकाली गेलेल्या त्यांच्या मित्राची, हमीद दलवाई यांची, अगदी जवळून सर्वार्थाने उत्तम ओळख करून देते. पुस्तक नितांत वाचनीय झाले आहे. त्यावेळची परिस्थिती एखाद्या भावपूर्ण चित्रपटासारखी डोळ्यासमोर उलगडते.

हमीद या अनिल अवचट यांच्या पुस्तकाची पहिली आवृत्ती १९७७ मध्ये नीलकंठ प्रकाशनने प्रकाशित केली. त्यानंतर डिसेंबर २०२०मध्ये मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊसने दुसरी आवृत्ती प्रकाशित केली आहे. या पुस्तकाला विजय तेंडुलकर यांची सविस्तर प्रस्तावना लाभली आहे. त्यांच्या मते, 'हे चरित्र नव्हे. हमीद दलवाई यांच्या एका पत्रकार मित्राने त्यांच्या निधनानंतर उत्स्फूर्तपणे लिहिलेला हा मजकूर आहे.' दलवाई हा त्यांचा मित्र सामान्य नाही; समाजसुधारक होता. हमीद यांच्याकडून लोकांच्या अपेक्षा होत्या. हमीद कुटुंबप्रमुख होते आणि चांगले मित्रही. तेंडुलकर यांच्या मते, प्रस्तुतचे पुस्तक एक चरित्रसाधन म्हणून निश्चित उपयुक्त ठरू शकेल. हमीद यांचे मोठे चरित्र लिहिले जाण्याची गरज तेंडुलकर यांनी शेवटी प्रतिपादन केली आहे. '**हमीदविषयी**'मध्ये अनिल अवचट यांनी आपले मनोगत सविस्तरपणे मांडले आहे. सुरुवातीलाच ते लिहितात, 'हमीद हे माझे सत्त्याहत्तर सालातले पुस्तक. हमीद गेल्यानंतर फक्त आठ दिवसांत हे पुस्तक लिहिले. हमीद जाऊन महिना झाला, त्याच दिवशी या पुस्तकाचे शरद पवारांचे हस्ते प्रकाशन झाले.' चाळीस वर्षांपूर्वीचे हे पुस्तक वाचताना त्यांच्या अनेक आठवणी जाग्या झाल्या. या पुस्तकावर आलेल्या उलट-सुलट प्रतिक्रियांचा अनुभवही त्यांनी मांडला आहे. या पुस्तकाचे रंगीत, आकर्षक मुखपृष्ठ दिलीप भंडारे यांचे आहे.

हमीद पुण्यात आल्यावर पूनम हॉटेलवर उतरत असे. दुसऱ्या दिवसापासून त्यांचे स्कूटरवर पुण्यात भटकणे सुरू होत असे. हमीद अस्वस्थ आणि आक्रमक व्यक्तिमत्त्वाचा माणूस होता. मुस्लिम समाजात आधुनिक मूल्ये रुजवणे, हे त्याचे मिशन होते. माणसांचे त्याला व्यसन होते.तिशीतील विविध मित्र एकत्र जमून, त्या वयानुरूप त्यांच्या विविध प्रकारच्या गप्पागोष्टी होत असत. त्यांची अनेक उदाहरणे वाचावयास मिळतात.

''हमीद देखणा होता. गोरा रंग, घारे डोळे, तरतरीत नाक, बोलणे नाकात- कोकणी व हेलात असायचे'' अशा नेमक्या शब्दांत हमीद यांना अवचट यांनी वाचकांसमोर उभे केले आहे. सेवादलात असल्यामुळे हमीद खादी घालीत असे.

हमीद 'मराठा' दैनिकात पत्रकार म्हणून ऐन तारुण्यात नोकरीला होता. अत्र्यांचा संस्कार आणि विनोदांचा संग्रह त्यांच्याकडे होता. हमीद सतत प्रवास करीत आणि नंतर त्यामधील गमतीजमती मित्रांना सांगत असत.

हमीदवर अनेक थोरामोठ्यांचे प्रेम होते. त्यांच्याविषयी, त्यांच्या कार्याविषयी सर्वांना कौतुक होते, आदरही वाटत होता. त्यांना मुस्लिम समाज सुधारणेचा ध्यास लागला होता. अवचट यांना, त्यांच्या दहा-बारा वर्षांच्या कामाची जवळून ओळख होती. इस्लामच्या तेराशे वर्षांच्या इतिहासात, इस्लामच्या भूमिकेला हमीद यांनी प्रथमच जाहीररित्या आव्हान दिले होते. त्यामुळे मुस्लीम इस्लामीजगतात खळबळ उडाली. हमीद यांनी मुस्लिम जातीयवादावर सडकून टीका केली होती. वैचारिक भूमिका घेतल्यावर ती अंमलात आणण्याचा खंबीरपणाही हमीद यांनी दाखविला. मुस्लिम स्त्रियांच्या तलाकचा प्रश्न त्यांनी हाती घेतला. समान नागरी कायद्याची मागणी करणारा पहिला, सहा मुस्लिम स्त्रियांचा मोर्चाही काढला. मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. हिंदू जातीयवादावरही हमीद टीका करीत असत.

हमीद यांच्या विविध आजारांबाबत अनिल अवचट यांनी सविस्तरपणे लिहिले आहे. शेवटच्या आजारातील वर्णन सहृदय वाचकाला हलवून टाकते. मृत्यूनंतर हमीद यांच्या इच्छेनुसार, त्यांच्या पार्थिवाचे ठाकूरद्वारच्या चंदनवाडीतील विद्युतदाहिनीत कोणत्याही धार्मिक संस्कारांशिवाय दहन केले गेले.

अनिल अवचट यांचे हे छोटेसे पुस्तक, अकाली गेलेल्या त्यांच्या मित्राची, हमीद दलवाई यांची, अगदी जवळून सर्वार्थाने उत्तम ओळख करून देते. पुस्तक नितांत वाचनीय झाले आहे. त्यावेळची परिस्थिती एखाद्या भावपूर्ण चित्रपटासारखी डोळ्यासमोर उलगडते.

या पुस्तकाचे लेखक आणि प्रस्तुत लेखकाचे आवडते लेखक, अनिल अवचट यांचे नुकतेच निधन झाले. या पुस्तक परीक्षणाद्वारे त्यांच्या जीवनकार्याला भावपूर्ण आदरांजली.

पुस्तकाचे नाव : हमीद
लेखक : अनिल अवचट
प्रकाशक : मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, गिरगाव, मुंबई -४००००४, पहिली आवृत्ती:३ जून १९७७, दुसरी आवृत्ती : डिसेंबर २०२०, पृष्ठे : ९२, मूल्य : रुपये १००.

विशेष
श्रद्धा वार्डे
९७६७१५२६०८

चिनी मद्यसंस्कृती

चीनच्या ग्रामीण भागात अनेक शेतकऱ्यांचा घरगुती वाईन तयार करणे, हा जोडधंदा आहे. मी पहिल्यांदा चीनला गेले तेव्हा सफिन्ग नावाच्या खेड्यात २० दिवस राहिले. गावात भातशेती तर होतीच; पण तांदळापासून वाईन बनवण्याचा एक छोटा कारखानाही होता. याशिवाय घरगुती वाईनची पण विक्री केली जात होती. ग्रामीण भागात प्रत्येक घरी घरगुती वाईन असते आणि पाहुण्यांचं स्वागत या घरगुती वाईनने केलं जातं. तांदळापासून बनवलेली व्हाईट वाईन असते.

महाराष्ट्रात किराणा मालाच्या दुकानांत वाईन विक्रीला परवानगी देण्यात आली. या निर्णयावर उलट-सुलट चर्चा सुरु झाल्या. हा निर्णय समाजासाठी घातक आहे. यामुळे संस्कृती धोक्यात येईल, असं मानणारा समूह आहे. तर, या निर्णयाचं समर्थन करणाराही समूह आहे. चीनमध्ये वाईन हा संस्कृतीचा आणि चिनी कार्यसंस्कृतीचा एक भाग आहे.

चीनच्या ग्रामीण भागात अनेक शेतकऱ्यांचा घरगुती वाईन तयार करणे, हा जोडधंदा आहे. मी पहिल्यांदा चीनला गेले तेव्हा सफिन्ग नावाच्या खेड्यात २० दिवस राहिले. गावात भातशेती तर होतीच; पण तांदळापासून वाईन बनवण्याचा एक छोटा कारखानाही होता. याशिवाय घरगुती वाईनची पण विक्री केली जात होती. ग्रामीण भागात प्रत्येक घरी घरगुती वाईन असते आणि पाहुण्यांचं स्वागत या घरगुती वाईनने केलं जातं. तांदळापासून बनवलेली व्हाईट वाईन असते. त्याचबरोबर गहू, मका यापासून पण वाईन तयार करतात. विविध फुलं, फळं यांपासून पण घरगुती वाईन तयार केली जाते. घोडीचं दूध, शेळीचं दूध त्याचबरोबर काही प्राण्यांचा वापर करून वाईन तयार केली जाते. सापांपासून वाईन तयार केली जाते. 'स्नेक वाईन' सगळ्यात महाग वाईन आहे आणि या वाईनला मागणी पण अधिक असते.

चिनी नवीन वर्ष १ फेब्रुवारीपासून सुरु झालं. यालाच वसंतोत्सव असंही म्हणतात. यानिमित्त चीनमध्ये अनेक कार्यक्रमांचं आयोजन केलं जातं. ड्रॅगन डान्सबरोबरच इतरही अनेक कार्यक्रमांचं आयोजन केलं जातं. चिनी नवीन वर्षाच्या स्वागतासाठी चीनमध्ये आठवडाभर सुट्टी असते. यालाच 'गोल्डन वीक' असं म्हणतात. नववर्षाचे स्वागत चिनी नागरिक कुटुंबासमवेत करतात. नववर्षाच्या स्वागतासाठी कौटुंबिक मेजवानीचं आयोजन केलं जातं. यामध्ये डम्पलिंग्स, हॉट पॉट, मासे असे अनेक पदार्थ असतात आणि यामध्ये वाईनचा पण समावेश असतो. नववर्षाचं स्वागत करताना वाईन घेतल्यास नवीन वर्ष चांगलं भाग्य घेऊन येतं, असा चीनमध्ये समज आहे. त्यामुळे नवीन वर्षाच्या स्वागताला वाईन अपरिहार्य मानली जाते. औपचारिक समारंभात, कार्यालयीन कार्यक्रमांचा वाईन अविभाज्य घटक आहे. या कार्यक्रमांमध्ये वरिष्ठ सहकारी जितक्या वेळा वाईनचा ग्लास वर करून चिनी भाषेत 'कानपेई' म्हणजेच 'चियर्स' करतात, तितक्या वेळा त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या सहकाऱ्यांनी कानपेई करणं अनिवार्य आहे. तो एक चिनी शिष्टाचार मानला जातो. तसे न केल्यास वरिष्ठांचा अपमान होतो.

चीनमध्ये तीन हजार वर्षे आधी मद्य तयार करण्यास सुरुवात झाली. इसवी सन पूर्व १००० दरम्यान चीनमध्ये किण्वन प्रक्रिया माहीत होती, त्यातून मद्यनिर्मिती केली जात होती. त्यावेळी धान्यापासून मद्यनिर्मिती होत होती. प्रामुख्याने तांदूळ, जडीबुटी, मका, फुलं आणि जंगली फळांचा वापर यासाठी केला जायचा. पण, हे मद्य जपान वगळता इतर देशात पोहोचू शकलं नाही. मद्य तयार करण्याची प्रक्रिया चीमध्ये सगळ्यात आधी सुरु झाली. त्यानंतर ५०० वर्षांनी युरोपात मद्यनिर्मितीला सुरुवात झाली. चीनमध्ये सातव्या शतकांत ब्रँडी तयार झाली, तर युरोपात इटलीमध्ये १२ व्या शतकात पहिल्यांदा ब्रँडी तयार झाली. हान राजवंशाच्या काळात, म्हणजे २०६ ते २२० दरम्यान चीनचा पाश्चिमात्य जगाशी संपर्क झाला आणि चांगल्या दर्जाची द्राक्ष चीनमध्ये आली आणि त्यातून द्राक्षांपासून मद्यनिर्मिती सुरु झाली. द्राक्षापासून तयार केलेली वाईन ही महाग आणि विदेशी मनाली जायची, त्यामुळे ती फक्त राजांसाठी असायची. तांदळापासून तयार केलेली वाईन तेव्हाही सहज उपलब्ध असल्याने सामान्य नागरिक तांदळाच्या वाईनला प्राधान्य देत असत, असं मार्को पोलोने म्हटलं आहे. मार्को पोलोने १३ व्या शतकात चीनला भेट दिली. यामध्ये अजूनही बदल झालेला नाही.



प्राचीन काळापासून मद्य हे चिनी संस्कृतीचा भाग आहे. प्राचीन काळी मद्य प्राशन करण्याचे काही नियम आणि शिष्टाचार होता. मद्य घेण्यापूर्वी, गुडघ्यावर बसून ते जमिनीवर सांडलं जायचं, ज्या जमिनीतून अन्नधान्य मिळालं, त्या धरतीचे आभार मानण्यासाठी हा प्रकार केला जायचा. त्यानंतर धार्मिक विधींमध्ये पण मद्याचा समावेश झाला. नवीन वर्ष, चिनी सण यावेळी पितरांना नैवेद्य दाखवला जातो, त्यामध्ये मद्य ठेवायला सुरुवात झाली. चीनमध्ये परदेशी पाहुण्यांना भेट देण्यासाठी किंवा मेजवानीसाठी परदेशी मद्य वापरलं जातं. पण, सरकारी आणि घरगुती कार्यक्रमात मात्र पारंपरिक चिनी येलो वाईन किंवा व्हाईट वाईनच असते.

चीनमध्ये १९ व्या शतकांत मद्यनिर्मितीचे व्यवसायात रूपांतर झालं. १९७० नंतर चीनमध्ये मद्यनिर्मिती व्यवसायात परदेशी गुंतवणुकीला परवानगी देण्यात आली. १९९६ मध्ये झालेल्या कम्युनिस्ट पक्षाच्या राष्ट्रीय अधिवेशनात द्राक्षाच्या वाईनची जाहिरात करण्यात आली. चिनी नागरिकांनी धान्यापासून बनवलेल्या वाईनचा वापर कमी करून द्राक्षाच्या वाईनचा उपयोग करावा आणि धान्य हे अन्न म्हणून वापरावं, हा संदेश देण्यासाठी ही जाहिरात करण्यात आली होती. चीनमध्ये परदेशी आणि चिनी अशी दोन्ही प्रकारची मद्य उपलब्ध आहेत. चीनमध्ये सचूहान, शान्क्सशी, हुनान, हुपेई, हनान, कुआंक्षी, फुचियान, चियांगसू, च्यछियांग आणि अनहुई या प्रांतांमध्ये मद्यनिर्मिती मोठ्या प्रमाणावर केली जाते. याशिवाय ग्रामीण भागात घरगुती मद्यनिर्मिती केली जाते, ती वेगळी. मद्य हा चिनी संस्कृतीचा भाग असल्याने किराणा मालाच्या दुकानात पण मद्य विक्री केली जाते.

कविता

नात्यांचा ओलावा संपत चाललाय...

गारठ्यात या थंडीच्या,
पांघरूण आठवणींचे येई,
सगळं काही असतानाही,
आठवण जुन्या दिवसांची करून जाई.

घर झाले मोठे,
खोल्याही वेगळ्या झाल्या,
आणि घरातल्यांसोबतच्या गप्पा संपून,
सर्वांच्या माना फक्त मोबाईलकडे
वळाल्या.

सोशल मीडियाने जगाला जोडले,
पण, नात्यांच्या वृक्षाला फांद्या फुटल्या,
थंडी आणि गच्ची आता नावाला उरली,
नाती आणि जाणीवा संपून गेल्या.

जगासोबत चालत असताना,
थोडे भान नात्यांचेही ठेवायला हवे,
सतत व्यस्त असणाऱ्या स्वत:ला,
आता तरी माणसात आणायला हवे.

संपत चाललेल्या नात्यांच्या ओलाव्याला,
मायेच्या उबेची गरज आहे,
आधीसारखं होईल सगळं,
फक्त सुरुवात आपल्यापासून होणं
गरजेचं आहे.

- कु.सायली सचिन पाटील, झिराड

टीम इंडिया-विंडीज आजपासून वनडे मालिका

। अहमदाबाद। वृत्तसंस्था।

भारत आणि वेस्ट इंडीज यांच्यातील एकदिवसीय मालिका रविवारपासून सुरू होत आहे. या मालिकेत नवा कर्णधार रोहित शर्मा आणि माजी कर्णधार विराट कोहली यांचे इक्वेशन कसे असणार हा चर्चेचा विषय आहे. असे असले तरी या दोघांनाही फलंदाजीची जोडी म्हणून एक मैलाचा दगड पार करण्याची संधी आहे. विराट कोहली आणि रोहित शर्मा या दोघांमधील नात्याची चर्चा कायम होत असते. मात्र या दोघांनी फलंदाज म्हणून एकदिवसीय क्रिकेटमध्ये चांगली कामगिरी केली आहे. ज्यावेळी हे

दोन स्टार फलंदाज एकत्र क्रीजवर असतात त्यावेळी विरूद्ध संघावर प्रचंड दबाव निर्माण करतात.

विराट-रोहित जोडीने वनडे क्रिकेटमध्ये आतापर्यंत ४९०६ धावांची भागीदारी रचली आहे. त्यांना ५००० च्या क्लबमध्ये सामिल होण्यासाठी फक्त ९४ धावांची गरज आहे.

भारताचा १००० वा सामना

ते सध्या वनडेमध्ये सर्वाधिक भागीदारीतल्या धावांच्या यादीत आठव्या क्रमाकावर आहेत. या यादीत सर्वात टॉपवर सचिन तेंडुलकर आणि सौरभ गांगुली यांची जोडी आहे. त्यांनी १७६ डावात ८२२७ धावा केल्या आहेत.

विराट-रोहित जोडीच नाही तर रोहित-शिखर जोडी देखील वनडेमध्ये भागीदारी रचण्यात आघाडीवर आहे. ५००० धावांची भागीदारी रचणाऱ्यांच्या यादीत भारताची ही दुसरी जोडी आहे. त्यांनी ११२ डावात ५०२३ धावा केल्या आहेत. मात्र विराट-रोहित (ठेहळीं डहरीर तळीरीं घेहश्रळ झरळी) जोडीची बातच काही और आहे. कारण या जोडीने भागीदारीच्या ५००० धावा पूर्ण केल्या तर ही जोडी भागीदारीत सर्वात वेगवान ५००० धावा करणारी जोडी ठरणार आहे.

> 'भारतासाठी कसोटी क्रिकेट खेळण्याचे स्वप्न मी बाळगले होते, हे मी पूर्णत: मान्य करतो. माझ्या बालपणीच्या काळात कसोटी क्रिकेटला अतिशय महत्त्व होते. पण एकदिवसीय क्रिकेटमध्येही छाप पाडण्यासही मी उत्सुक होतो.'
>
> **सचिन तेंडूलकर,क्रिकेटर**

त्यांनी ८१ डावात ४९०६ धावा केल्या आहेत. त्यांची सरासरी देखील ६४.५५ इतकी आहे. बाकीच्या सर्व जोड्यांनी वनडे क्रिकेटमध्ये भागीदारीत ५००० धावा करण्यासाठी १०० पेक्षा जास्त डाव घेतले आहेत.

सचिनला सामन्याची उत्सुकता

भारतीय संघ रविवारी एकदिवसीय क्रिकेटमधील एक हजारावा सामना खेळणार आहे. आतापर्यंतच्या भारताच्या ९९९ एकदिवसीय सामन्यांपैकी सर्वाधिक ४६३ सामन्यांमध्ये सचिनने प्रतिनिधित्व केले आहे. १९९१मध्ये आर्थिक उदारीकरण झाले, याच काळात तेंडुलकर नावाचा ब्रँड उदयास आला.

म ह त्त्वा चे

हिवाळी ऑलिम्पिकला बीजिंगमध्ये प्रारंभ

बीजिंग : दोन वर्षांपूर्वी करोनामुळे उद्ध्वस्त झालेला चीन देश आता हिवाळी ऑलिम्पिकच्या रंगात न्हाऊन जाण्यासाठी सज्ज झाला आहे. काही पाश्चिमात्य देशांनी बहिष्कार घातलेल्या बीजिंग हिवाळी ऑलिम्पिकचा शानदार उद्घाटन सोहळा झाला. या निमित्ताने बीजिंग हा दोन्ही ऑलिम्पिकचे आयोजन करणारा पहिलाच देश ठरला आहे. चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनिपग आणि आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच अध्यक्ष थॉमस बाख यांच्या उपस्थितीत नॅशनल स्टेडियमवर झालेल्या या सोहळय़ात लेझर-किरणांचा देखावा सादर करण्यात आला. भारताने या स्पर्धेच्या प्रक्षेपणावर बहिष्कार टाकला असून आरिफ खान हा एकमेव भारतीय स्पर्धक या ऑलिम्पिकमध्ये सहभागी झाला आहे.

श्रीलंका मालिके आधी रहाणे, पुजारा रणजीत खेळणार

। नवी दिल्ली। वृत्तसंस्था।

श्रीलंका मालिकेआधी होणाऱ्या रणजी करंडक स्पर्धेतील कामगिरीचा आढावा घेऊन निवड समिती भारताचा संघ निवडेल. त्यामुळे अजिंक्य रहाणे आणि चेतेश्वर पुजाराला कामगिरी दाखवण्याची सुवर्णसंधी असेल, असे बीसीसीआय अध्यक्ष सौरव गांगुलीने म्हटले आहे.

ङ्गङ्घरणजी करंडक स्पर्धेला १० फेब्रुवारीपासून प्रारंभ होत आहे. तर श्रीलंकेविरुद्धची कसोटी मालिका ही मार्चमध्ये आहे. त्यामुळे रणजी स्पर्धेत रहाणे आणि पुजाराने सातत्याने धावा काढल्यास त्यांना संघातील स्थान टिकवता येईल. अर्थात हा निर्णय निवड समितीच्या अखत्यारित येतो,फक्त असे गांगुलीने सांगितले.

रणजी सामन्यांच्या संख्येत कपात झाल्यामुळे खेळाडूंना आर्थिक फटका बसेल, याबाबत गांगुली म्हणाला, ङ्गङ्घखेळाडू विजय हजारे आणि सय्यद मुश्ताक अली स्पर्धेत खेळल्याबद्दलही वाढीव मानधन मिळाले आहे.

> यंदाची आयपीएल क्रिकेट भारतात व्हावी, याबाबत आम्ही आशावादी आहोत. योजनाही आमच्याकडे तयार आहे. देशातील करोना साथीच्या स्थितीचा आम्ही आढावा घेऊन याबाबत निर्णय घेऊ,
>
> **सौरव गांगुली,बीसीसीआय अध्यक्ष**

ऑस्ट्रेलिया क्रिकेट संघातही राजीनामा सत्र

। मेलबर्न। वृत्तसंस्था।

ऑस्ट्रेलिया संघाचे मुख्य प्रशिक्षक जस्टीन लँगर यांनी आपल्या पदाचा राजीनामा देत सर्वांनाच धक्का दिला. विशेष म्हणजे त्यांच्या कार्यकाळात ऑस्ट्रेलियाने ॲशेस मालिकेत इंग्लंडचा ४-० असा पराभव केला. याचबरोबर ऑस्ट्रेलियाने टी २० वर्ल्डकप देखील जिंकला. जस्टीन लँगर आणि क्रिकेट ऑस्ट्रेलिया यांच्यात त्यांचा करार वाढवून देण्याबाबत दीर्घ चर्चा सुरू होती. मात्र लँगर यांनी अचानक राजीनाम्याचा बॉम्ब टाकला.

जस्टीन लँगरला क्रिकेट ऑस्ट्रेलियाने त्यांच्या पदासाठी पुन्हा अर्ज करण्यास सांगितले होते. तसेच त्यांना छोट्या कालावधीसाठी करारबद्ध करण्यात येणार होते. याचा लँगर यांना राग आल्याची चर्चा सुरू आहे. ऑस्ट्रेलियाने ॲशेस मालिका ४-० अशी जिंकल्यानंतर ती जागतिक कसोटी क्रमवारीत अव्वल स्थानावर पोहचली आहे.दरम्यान, जस्टीन लँगर यांच्या राजीनाम्यावर आपली प्रतिक्रिया दिली. मजस्टीन यांना त्यांच्या सध्याच्या करारात छोटी मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता.

तळा प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

। तळा,। वार्ताहर।

तळा क्रिकेट असोसिएशनच्या माध्यमातून तळा प्रीमियर लीग २०२२(पर्व ४ थे) ही स्पर्धा दिनांक १८ ते २० फेब्रुवारी रोजी बोरघर क्रीडा संकुल मैदान येथे आयोजित करण्यात आली आहे.

सदर स्पर्धेमध्ये सोहम सुपरकिंग - संघ मालक चंद्रकांत रोडे, विनायक मुंढे, एकविरा स्पोर्ट भाई फायटर्स - संघमालक प्रदीप (बाबू) फुलारे, व्ही. एम.कॅपिटल्स- संघमालक- विनायक (भाई) महाडकर, मोहम्मद अली बाणकोटकर, संदिप वॉरीयर्स-संघ मालक-रितेश मुंढे, किशोर मोरे, सर्फराज गोठेकर, खाचे कार्लेकर रायडर्स- संघ मालक- इर्शाद खाचे, निलेश कार्लेकर, पद्मदुर्ग फायटर्स- संघ मालक-प्रचित मसाल, एस.ऐ.वॉरीयर्स- संघ मालक- शैलेश घोलप, अविनाश शिंदे, ए. पी.चायलेजर्स- संघमालक-अविनाश पिसाळ, प्रमोद काप असे ८ संघ सहभागी झाले आहेत.या स्पर्धे करिता खेळाडू लिलाव कार्यक्रम हॉटेल आसावरी येथे पार पडला यावेळी क्रिकेट या खेळासाठी नेहमी सहकार्य करणारे व या स्पर्धेचे मागील पर्वाचे संघमालक संदिप मोरे, सुप्रभात कुंडे व बाळशेठ लोखंडे यांचे आकस्मिक निधन झाल्यामुळे त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. ही स्पर्धा तळा तालुका मर्यादित असून या स्पर्धेत एकूण ११९ खेळाडूंनी आपले नोंदणी अर्ज भरले होते

आयपीएल लिलावासाठी पाक लिग स्पर्धेला नारळ

। नवी दिल्ली। वृत्तसंस्था।

आयपीएलच्या १५व्या हंगामाआधी होणाऱ्या मेगा लिलावाची तारीख जवळ येत आहे. आयपीएल २०२२ साठी मेगा लिलाव येत्या १२ आणि १३ फेब्रुवारी रोजी बेंगळुरू येथे होणार आहे. यासाठी बीसीसीआय सोबत स्पर्धेतील १० संघ जोरदार तयारी करत असताना एक मोठी घटना घडली आहे.

झिम्बाब्वेचे सर्वात यशस्वी क्रिकेटपटू अँडी फ्लॉवर यांनी पाकिस्तान क्रिकेट बोर्ड आणि पाकिस्तान सुपर लीग स्पर्धेला फाट्यावर मारले आहे. आयपीएलच्या मेगा लिलावासाठी फ्लॉवर यांनी पीएसएलचा सातवा हंगाम अध्यावर सोडलाय. झिम्बब्वेचे माजी कर्णधार फ्लॉवर बेंगळुरू येथील लिलावात सहभागी होणार आहेत. ते नवा संघ लखनऊ सुपर जायंट्स संघाचे मुख्य कोच म्हणून लिलावात सहभागी होतील.

पाकिस्तान क्रिकेटमधील मुल्तान सुल्तान संघातील अधिकाऱ्यांच्या हवाल्याने समोर आलेल्या वृत्तानुसार फ्लावर पीएसएलसाठी मार्गदर्शन कायम ठेवणार आहेत. ते १३ फेब्रुवारी रोजी पाकिस्तानमध्ये परत येथील. पण यामुळे सुल्तान कमीत कमी १० दिवस प्रशिक्षकाशिवाय असेल. १२ आणि १३ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या लिलावात फ्लॉवर लखनऊ सुपर जायंट्स संघाचे नेतृत्व करतील. भारतात ते लवकर दाखल होणार आहेत कारण लिलावाची रणनिती आखावी लागले. या दरम्यान सुल्तान संघाला ५, १० आणि ११ फेब्रुवारी रोजी सामने खेळायचे आहेत.

जिओ चा नेटवर्क डाउन हॅशटॅग जिओ डाउन ट्रेंड

वर्षा मेहता

। अलिबाग ।

मुंबई टेलिकॉम सर्कलमध्ये रिलायन्स जिओचे नेटवर्क कमी झाले होते. अनेक लोकांनी नोंदवले आहे की रिलायन्स जिओ नंबरवर आणि वरून कॉल कनेक्ट करण्यात अक्षम आहेत. ट्विटरवरील अनेक जिओ वापरकर्त्यांनी सांगितले आहे की ते सध्या त्यांच्या जिओ नंबरसह कोणतेही सेल्युलर कॉल करू शकत नाहीत. दरम्यान, नॉन-जिओ नंबर असलेल्यांनाही जिओ नंबर असलेल्यांना कॉल कनेक्ट करण्यात अडचणी येत आहेत.



SOCIAL MEDIA पडसाद

बाधित क्षेत्रांमध्ये सर्व उपनगरी मुंबई तसेच कल्याण आणि डोंबिवली सारख्या ठाणे विभागांचा समावेश आहे. शनिवारी दुपारी रिलायन्स जिओ वापरकर्ते त्यांच्या नेटवर्क कनेक्शनमध्ये काय चूक झाली याचा गोंधळ झाला. परिस्थिती लक्षात आणण्यासाठी अनेकांनी त्यांच्या पर्यायी सिम नेटवर्कद्वारे किंवा वाय-फाय कनेक्शनद्वारे सोशल मीडियाचा वापर केला. मोबाईल नेटवर्किंग सेवेचा सर्व्हर डाउन होत असताना नेटिझन्स ट्विट मजकूर आणि आनंदी मीम्सने भरून गेले. नेटवर्क अनुपलब्धतेची तक्रार करणाऱ्यांपैकी बहुतांश मुंबईतील होते. अनेकांना त्यांचे काम पूर्ण करता आले नाही म्हणून राग आला.

अलिबागमध्ये तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात

। अलिबाग । शहर वार्ताहर ।

भारत सरकार अंतर्गत युवा कार्यक्रम तथा क्रीडा मंत्रालय संचालित नेहरु युवा केंद्र, रायगड-अलिबाग, स्वयंसिद्धा सामाजिक विकास संस्था, रोहा आणि प्रिझम सामाजिक विकास संस्था, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने तथा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग यांच्या विशेष संयोजनाने तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी तालुका क्रीडा अधिकारी अंकिता मयेकर, नेहरु युवा केंद्र, रायगडचे जिल्हा युवा अधिकारी निशांत रौतेला यांची प्रमुख उपस्थिती होती.

नेहुली येथील जिल्हा क्रीडा संकुल. अलिबाग येथे खुल्या गटात आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धात्मक कार्यक्रमातून तालुक्यातील विविध भागातून युवावर्गाने आपला सहभाग नोंदविला. कोरोना विषयक आरोग्यनिर्बंधांचे पालन करत हा कार्यक्रम संपन्न झाला असून, यामध्ये मुलींसाठी १०० मीटर, ८०० मीटर, ३ किमी धावणे तर मुलांसाठी १६०० मीटर, ५ किमी धावणे, गोळा फेक, लांब उडी, व्हॉलीबॉल या क्रीडाप्रकारांचा समावेश करण्यात आला होता. उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झालेल्या प्रत्येक क्रीडाप्रकारात पंच म्हणून यतिराज पाटील यांनी काम पाहिले असून, कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी तपस्वी गोंधळी, भारतीय लष्करातील जवान मयुरेश गावंड, स्वयंसिद्धा संस्थेच्या अध्यक्षा सुचिता साळवी, रायगड भूषण दीपक मोकल यांनी विशेष परिश्रम घेतले.

कु शार्वी(जिजा) योगेश देशमुख
जन्मतारीख : ६/०२/२०१९
हिस तिसऱ्या वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
मु.पो.महाड, ता.महाड जि.रायगड

शुभेच्छुक
आई-डॅड, आजी-आजोबा, मम्मी-बाबा, ननू,माऊ, मामा-मामी, दिदी, गणू दादा, आणि परिवार

प्रेम व खरेपणा हाच खरा धर्म होय

देशाचे स्वातंत्र्य व पठाणांचा विकास करण्यासाठी आयुष्यभर अहिंसक संघर्ष करणारे खान अब्दुल गफ्फार खान यांची ६ फेब्रुवारी रोजी जयंती आहे. ते बादशाह खान, सरहद गांधी म्हणून ही ओळखले जातात.

पाकिस्तान-अफगाणिस्तानाची ती भूमि जी आज दशहत व हिंसेने पोळते आहे त्या भूमीवर मानवाच्या सेवेत खान साहेबांनी आपले आयुष्य वेचले होते.

पठाणामध्ये कबिले होते. टोळ्या होत्या त्यांच्यात शत्रुत्व असायचे. हिंसा व्हायची दहशत व मारपीट व्हायची. दुसरीकडे इंग्रजांनी त्यांना दाबून ठेवले होते. भय आणि लाचारीत पठाण जगत होते. गुलामीचे कारण भय आहे. जोपर्यंत इंग्रजांची गुलामी राहिल तोपर्यंत परिस्थिती बदलणार नाही. याच कारणाने बादशाह खान यांनी प्रथम आपल्या गावात शाळा काढली. शाळेचे माध्यम मातृभाषा होते. 'पश्वून नावाचे पहिले वर्तमानपत्र त्यांनी काढले 'खुदाई खिदमतगार' नावाचे स्वयंसेवक पथक तयार केले. स्वयंसेवक लाल रंगाचे कपडे घालीत. त्यांना लाल डगलेवाला असेही म्हटले जायचे. या पथकाच्या नियमात लिहिले होते की प्रजेची सेवा हीच ईश्वर सेवा आहे. म्हणून मी नि.स्वार्थ भावनेने मानवमायेची सेवा करीन. मी हिंसा करणार नाही. मी कोणाचा बदला घेणार नाही. अपराध्याला मी क्षमा करेन. शाळा वर्तमानपत्र व सुदाई सिदमतगार द्वारा बादशाह खानांनी

निमित्त
जयंत दिवाण

पगणांत जागृती निर्माण केली. त्यांना भयमुक्त केले. स्वातंत्र्य आंदोलनाशी जोडले. इंग्रज म्हणू लागले. अहिंसक पठाण हा हिंसक पठाणा पेक्षा ही अधिक भितीदायक आहे. बादशाह खान व त्यांच्या अनुयानांना सतत तुरूंगाच्या यातना भोगाव्या लागल्या. सरहदी ईलाक्यात बादशाह खानांनी धर्मनिरपेक्षता व अहिंसेचे असे वातावरण निर्माण केल की १९४८ व त्या आधीही तेथे काँग्रेसचे मंत्रीमंडळ निवडून आले आहे. फोडा व झोडाचे इंग्रजांचे राजकारण तेथे जमू शकले नाही. धर्म व राष्ट्र यांची गल्हत तेथे बादशाह खानांनी होऊ दिली नाही. भारत, पाकिस्तानच्या फाळणी सोबतच त्यांनी पठाणीस्तानाची मागणी केली. ती पूर्ण होणे शक्यच नव्हते. कारण इंग्रजांना या उपखंडात कायमची अस्थिरता माजवायची होती. असहाय्यतेने त्यांना पाकिस्तानात जावे लागले. त्यांच्या आयुष्याचे बहुतांश वर्ष पाकिस्तानाच्या जेल मध्ये गेलीत. ते नेहमी म्हणायचे की, देशाला स्वातंत्र्य कोणी मिळवून दिले आहे तर ते पठाणांनी! सर्वात जास्त हौतात्म्य कोणी दिले आहे. तर ते पठाणांनी! आयुष्याच्या शेवटी त्यांनी पठाणीस्तानच्या स्वातंत्र्याची मागणी केली. गांधी जन्मशताब्दीत बादशाह खान भारतात आले होते. लोकसभेत भाषण देतांना ते म्हणाले 'अनेक वर्षापासून माझी इच्छा होती की हिंदूस्तानात जावे आणि तेथील स्थिती स्वताःच्या डोळ्यांनी पहावी. मी हे पाहू इच्छित होतो की गांधीजीनी सांगितलेल्या मार्गावरून आपण किती चालला आहात. स्वातंत्र्यांनंतर गांधीजीनी ज्या अपेक्षा हिंदुस्तानकडून ठेवल्या होत्या. त्या पूर्ण झाल्या का नाही. आणि जर त्या पूर्ण झाल्या नाहीत तर त्या कशा पूर्ण होतील या बद्दल आपल्याशी विचार विनिमय करावे आणि हिंदुस्तानचा भलेपणा व कल्यासाठी मार्ग शोधायला आपली मदत करावी

गांधीजी प्रमाणे बादशाह खानांचे जीवन देखील अहिंसेचा अमर संदेश देते. १९८५ मध्ये ते म्हणाले होते, 'आज जग कोण्या विचित्र दिशेला चालले आहे. विश्व हिंसा व विनाशाकडे चालले आहे. ही हिंसा लोकांत भय व घृणा उत्पन्नत करते. मी अहिंसवर विश्वास ठेवणारा आहे. जोपर्यंत जगात अहिंसेचे पालन होणार नाही तो पर्यंत कोणालाही शांती लोकांना मिळू शकत नाही. कारण अहिंसा प्रेम आहे आणि ती लोकांत शौर्य निर्माण करते.'

वयाच्या ९८व्या वर्षी १९८८ साली त्यांचे निधन झाले. त्यांच्या इच्छेप्रमाणे काबूल मध्ये त्यांना दफविण्यात आले. शेवटचा मोगल सम्राट बहादुर शाह जफरची कबर देखील त्याच्या मुलखात नाही तर रंगूनमध्ये आहे. हा नियतीचा खेळ अगम्य आहे प्रेम व बंधुभाव टिकविणे हीच खरी बादशाह खान यांना खरी श्रध्दांजली ठरेल.

कृषीवल
क्रीडा संघटनांना आवाहन

रायगड जिल्ह्यात विविध क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जात आहेत. त्यामुळे क्रीडाक्षेत्रात नैपुण्य मिळविण्याची संधी खेळाडूंना मिळत आहे. त्यामधून क्रीडापटू तयार व्हावेत आणि त्यांना यथायोग्य प्रसिद्धी लाभावी यासाठी कृषीवलतर्फे सर्वच क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाची तसेच स्पर्धा झाल्यानंतरचे वृत्त कृषीवलमध्ये विनामुल्य प्रसिद्ध केले जाणार आहे. यासाठी सर्व क्रीडा संघटना,आयोजकांना आवाहन करण्यात येते की त्यांनी आयोजित केल्या जाणाऱ्या स्पर्धांची सविस्तर माहिती, स्पर्धेचे उद्घाटन,स्पर्धेचे बक्षिस वितरण आदींची माहिती कृषीवलकडे krushivalnews@gmail.com या मेलवर पाठवावी.त्यास तातडीने प्रसिद्धी दिली जाईल.

स्पर्धेसाठी माध्यम प्रायोजकबाबत कृषीवल कार्यालयाशी संपर्क साधावा.

- मुख्य संपादक

हजारो वर्षांची परंपरा लाभलेल्या भगवद्गीतेचे महत्त्व भावी पिढीलाही ज्ञात व्हावे, हा उदात्त दृष्टिकोन समोर ठेवून इस्कॉन 'हरे कृष्ण' नामहट, अलिबाग केंद्रातर्फे विद्यार्थी तसेच खुल्या गटासाठी भगवद्गीता पाठांतर स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा विनामूल्य असून, विजयी होणाऱ्यांना रोख बक्षिसेही दिली जाणार आहेत.

विद्यार्थी गट- ५ वी ते १० वी,
खुला गट- ११ वी ते पुढे (मुला/मुलींसाठी)
दैनिक कृषीवलमध्ये दररोज छापून येणाऱ्या भगवद्गीतेतील प्रत्येक अध्यायानंतर १० प्रश्न विचारले जातील. त्याची उत्तरे दोन्ही गटांनी द्यायची आहेत. प्रत्येक गटासाठी पुढीलप्रमाणे बक्षिसे दिली जातील.
(प्रथम क्रमांक ५ हजार रुपये, द्वितीय ३ हजार रुपये, तृतीय २ हजार रुपये, उत्तेजनार्थ १ हजार रुपये)
अधिक माहितीसाठी तसेच प्रश्नाची उत्तरे सादर करण्यासाठी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

श्री. गुरुनाथ बळीराम नाईक, पत्ता- संत रोहिदास नगर, 'वृंदावन' घर क्र. ७२, चेंढरे कावेरी बिल्डींग समोर ९४२३०९१०८१
पाठांतर केलेले श्लोक सादर करण्याची वेळ व ठिकाण वेळोवेळी जाहीर केले जाईल.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2021)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : इब्राहीम अफगाण* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)